रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ९२
www.ramprahar.com
◆ सोमवार, १९ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## नालासोपारा प्रकरण : आरोपीविरोधात आणखी एक गुन्हा



**नालासोपारा** : येथील लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना केल्यानंतर तपास वेगाने पुढे जात आहे. मुख्य आरोपी आरिफ शेखविरोधात आणखी एका २२ वर्षीय तरुणीने धाव घेतल्याने त्याच्यावर आणखी एक गंभीर गुन्हा दाखल झाला असून यामुळे या सेक्स रॅकेटची व्याप्ती वाढण्याची दाट शक्यता आहे. या नवीन प्रकरणात समोर आलेल्या माहितीनुसार आरोपी आरिफने 'हिंग' या डेटिंग ॲप्लिकेशनच्या माध्यमातून २२ वर्षीय फिर्यादी तरुणीशी ओळख वाढवली. तिला विश्वासात घेऊन आरोपीने आपल्या घरी बोलावले आणि तिच्यावर अत्याचार केला असल्याचा आरोप आहे. यादरम्यान त्याने तिचे अश्लील व्हिडिओ मोबाईलमध्ये रेकॉर्ड केले. याशिवाय, पैशांची गरज असल्याचे भासवून आरोपीने तिच्याकडून दोन सोन्याच्या अंगठ्याही उकळल्या. याप्रकरणी तपास सुरू आहे.

## अंतरंग

प्रतापगडावर शिवशौर्याचा तेजोमय जागर/२
रिलायन्स कंपनीतून साहित्याची चोरी/५
पूर्वा कोळेकरला राज्य कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक/८

# विधान परिषदेच्या पाचही जागा महायुती जिंकणार : मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी पहिल्यापासूनच विभाजित आहे. विशेषतः गटाचे राजकारण मोठ्या प्रमाणात आहे. आम्ही भाजप महायुती म्हणून एकसंघपणे काम करत आहोत. विधान परिषद पदवीधर, शिक्षक मतदारसंघाच्या पाचही जागांवर महायुतीचा विजय होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. ते पत्रकारांशी बोलत होते.

विधान परिषदेची शिक्षक, पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसंदर्भात सर्व जागांवरील स्थितीबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी भाष्य केले. ते म्हणाले की, नागपूरचा विचार केला तर भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय यासह आमचे सगळे मित्रपक्ष काम करताना दिसत आहेत. नागपूर पदवीधर मतदारसंघात सुधाकर कोहळे आमचे उमेदवार आहेत. शैक्षणिक क्षेत्रात आमच्या सरकारने काय काम केले आहे याची माहिती एका बैठकीत दिली. मोठ्या प्रमाणात या ठिकाणी



आमच्या उमेदवाराला मते मिळतील. विविध संघटनांशी चर्चा करणार आहे.

अमरावतीत किरण सरनाईक हे महायुतीचे उमेदवार आहेत. भाजप पूर्णपणे त्यांच्या पाठीशी आहे. पुणे पदवीधर मतदारसंघात डॉ. स्मिता जाधव आमच्या उमेदवार आहेत. संपूर्ण महायुती त्यांच्या पाठीशी आहे. काही भागात राष्ट्रवादीचे प्राबल्य चांगले आहे. स्वतः सुनेत्रावहिनींनी बैठक घेऊन सर्व कार्यकर्त्यांना कामाला लावलेले आहे. शिवसेना कामी लागली आहे. पुणे शिक्षक मतदारसंघ आहे, तिथे आमची मैत्रीपूर्ण लढत आहे. असे असले तरी कुठेही बेबनाव पाहायला मिळत नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगरला सतीश चव्हाण आहेत, त्यांच्या पाठीशी शिवसेना आणि भाजप पूर्णपणे उभी आहे. मंत्री संजय शिरसाट यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, आम्ही महायुतीसोबत आहोत. भाजप पहिल्या दिवसापासून कामाला लागला आहे. एखाद्या व्यक्तीने वेगळी भूमिका घेतली म्हणजे ती पक्षाची भूमिका मानली जात नाही. त्यामुळे पाचही जागा आमच्या महायुतीच्या निवडून येतील, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### 'उद्धव ठाकरे स्वतःच्या पक्षातील रेजीम थांबवू शकले नाहीत!'

**नागपूर** : उद्धव ठाकरे स्वतःच्या पक्षातील रेजीम थांबवू शकते नाहीत, ते आता कोणत्या रेजीम चेंजबाबत बोलत आहेत ते माहिती नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार पलटवार केला. उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी प्रशांत भूषण यांनी केलेल्या रेजीम चेंजच्या वक्तव्याचे समर्थन केले होते. त्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले.
भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान आहे. संविधानाची ताकद त्यांचे मनसुबे कधीही पूर्ण होऊ देणार नाही, या शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना सुनावले आहे.

### पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणूक

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांगलीच्या कुंडल येथे सभा





**सांगली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६च्या अनुषंगाने सांगली जिल्ह्यातील कुंडल येथे भाजपची सभा पार पडली. यावेळी भाजप प्रदेश चिटणीस तथा प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांसोबत संवाद साधत निवडणुकीच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला.

या सभेला भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा क्रांती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड, भाजप कामोठे मंडळ अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे नगरसेवक विकास घरत, मंडळ उपाध्यक्ष नाना जरग, ओबीसी मोर्चाचे मंडळ अध्यक्ष भाऊ भगत, चिटणीस जयकुमार डिगोळे, वसई-विरारचे नगरसेवक गणेश पाटील, दौलतराव आहेर शिक्षण संस्थेचे विश्वस्त वीरेंद्र गुजर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्वांनी एकत्र येऊन निवडणुकीच्या कामाला गती देण्याचे आवाहन केले तसेच पदवीधर उमेदवार डॉ. स्मिता जाधव आणि शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या प्रचाराच्या अनुषंगाने जबाबदाऱ्यांचा आढावा घेतला. या सभेदरम्यान कार्यकर्त्यांमध्ये अत्यंत उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.

## संघटनात्मक तयारीचा घेतला आढावा

**सांगली** : महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रदेश चिटणीस तथा प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगली जिल्ह्यातील पलूस आणि कडेगाव परिसरात पक्षाच्या संघटनात्मक तयारीचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत त्यांनी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला.



निवडणुकीच्या दृष्टीने संघटन विस्तार, मतदारांशी प्रभावी व थेट संपर्क, बूथस्तरीय सूक्ष्म नियोजन आणि निवडणुकीशी संबंधित विविध तांत्रिक व संघटनात्मक बाबींवर सखोल चर्चा करण्यात आली. **(पान २ वर..)**

## बीडमध्ये भीषण अपघातात पाच जणांचा मृत्यू

**बीड : प्रतिनिधी**

तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापूरला जाणाऱ्या भाविकांना घेऊन जाणारी कार एसटी बसला धडकली. बीड जिल्ह्याच्या माजलगाव तालुक्यात शिंदेवाडी फाट्याजवळ रविवारी (दि.१८) सकाळी झालेल्या या भीषण अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी आहे.

माजलगाव येथील एक कुटुंब कारने तुळजापूरला जात होते. खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर शिंदेवाडी जंक्शनजवळ कार बसला धडकली. या अपघातात कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये ओंकार महादेव गिरी (वय २४), गजानन महादेव नामदास (वय ३८), माऊली गजानन नामदास (वय ११), सोमनाथ बाडे (वय २३) आणि अनिल आचार्य (वय ४०) यांचा समावेश आहे. एक जण गंभीर जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

## कारच्या धडकेत एकाचा मृत्यू, सात जण जखमी

**नाशिक** : सप्तशृंगी गडाच्या पायथ्याशी नांदुरी टी पॉईंटवर बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना भरधाव कारने धडक दिल्याची भीषण घटना रविवारी मध्यरात्री दोन वाजता घडली. यात एका पोलीस उपनिरीक्षकाचा मृत्यू झाला. तीन पोलीस कर्मचाऱ्यांसह सात जण जखमी झाले असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## निवडक

### मध्य प्रदेशात ट्रकने भाविकांना चिरडले; १४ जणांचा मृत्यू

**ग्वाल्हेर** : मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथे एक भरधाव अनियंत्रित ट्रक दुकाने आणि भाविकांना चिरडत शीतला माता मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार आणि संरक्षक भिंतीला धडकला. रविवारी मध्यरात्री झालेल्या या भीषण अपघातात १४ भाविकांचा मृत्यू झाला असून २९ जण गंभीर जखमी झाले आहेत. कर्तव्यावर असलेले दोन पोलीसही अपघातात जखमी झाले असून सर्व जखमींवर उपचार सुरू आहेत.

### कोलकाता चेंगराचेंगरीतील मृतांचा आकडा वाढला

**कोलकाता :** पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथील चोरबागान सार्वजनिक दुर्गापूजा मंडपात शनिवारी रात्री चेंगराचेंगरीची घटना घडली होती. या दुर्घटनेतील मृतांची संख्या १९ झाली असून २५ जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून प्रत्येकी २५ लाख रुपये देण्यात येणार असून जखमींच्या उपचारांचा खर्च सरकारकडून केला जाणार आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतूनही मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

## लिमये वाचनालय पनवेलची शान -लोकनेते रामशेठ ठाकूर



### नवीन इमारतीचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय हे पनवेलची शान आहे, असे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवीन इमारतीच्या भूमिपूजनावेळी काढले तसेच तसेच या वाचनालयाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

पनवेल येथील ऐतिहासिक लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन समारंभ रविवारी (दि. १८) माजी सनदी अधिकारी तथा ज्येष्ठ साहित्यिक दिलीप पांढरपट्टे यांच्या हस्ते वाचनालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.

या सोहळ्याला माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, नगरसेविका दर्शना भोईर, सुधीर कांडपिळे, दत्तात्रेय जाधव, दीपा पाटणकर, अनंत सिंगासने, शशिकांत काडोंडकर, जयवंत गुर्जर, संजय बोदार्डे, लिमये वाचनालय व ग्रंथालयाच्या अध्यक्ष सुनीता जोशी, उपाध्यक्ष बी.पी. म्हात्रे, सचिव जयश्री शेट्ये, कोषाध्यक्ष प्रकाश पाटील, सुनील खेडेकर, स्मिता गांधी, हेमालिनी कुलकर्णी, रोहिदास पोटे, काशिनाथ जाधव, ग्रंथपाल निकिता शिंदे, राजकुमार ताकमोगे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## 'मराठी माझी देवालाही आवडे'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते महापौर नितीन पाटील यांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि पनवेल तालुका पत्रकार विकास मंच यांच्या वतीने मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याच्या दुसऱ्या वर्धापन दिनाचे औचित्याने मराठी माझी देवालाही आवडे या संतगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रंगलेल्या या कार्यक्रमास रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पनवेल महानगरपालिकेच्या दशकपूर्तीनिमित्त महापौर नितीन पाटील यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले, तर प्रशासनाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये यांचा सन्मान करण्यात आला.



कल्पिता राणे यांच्या संकल्पनेतून सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमात मराठी भाषेच्या अभिजात प्रवासाचा लेखाजोखा संतगीते आणि नृत्यांच्या माध्यमातून रसिक प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आला. डॉ. राम पंडित आणि तन्वी गोरे यांच्या सुमधुर गायनाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. कल्पिता यांनी प्रत्येक गीताला समर्पक नृत्याचा साज चढविल्याने कार्यक्रमाने उंची गाठली.

उपस्थित रसिक प्रेक्षकांसमोर मनोगत व्यक्त करताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, हल्ली मी आलेल्या आमंत्रणांपैकी फक्त दहा टक्के कार्यक्रमांना हजेरी लावायचा प्रयत्न करतो. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचने मला या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले; त्याचवेळी मी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहायचे असे ठरविले होते. **(पान २ वर..)**



# श्रीवर्धनमध्ये अवैध हातभट्टी दारूवर पोलिसांचा छापा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील गालसुरे काठी आणि निगडी काठी येथे सुरू असलेल्या अवैध दारू धंद्यांवर श्रीवर्धन पोलिसांनी शनिवारी पहाटे धडक कारवाई केली आहे. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे टाकलेल्या या छाप्यात पोलिसांनी सुमारे ५५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत चार जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, १७ ऑक्टोबर रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास गालसुरे आणि निगडी काठी परिसरात गावठी हातभट्टीची दारू विक्री आणि निर्मिती सुरू असल्याची खबर पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी तात्काळ दोन पथके तयार करून एकाच वेळी दोन्ही ठिकाणी छापे टाकण्याचे आदेश दिले.पोलीस उपनिरीक्षक प्रदिप राठोड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केलेल्या कारवाईत ६५० मिलीच्या ५८ लंडन पिल्सनर बिअरच्या बाटल्या, ९०० लिटर हातभट्टी तयार करण्याचे रसायन आणि ८ लिटर तयार गावठी दारू जप्त करण्यात आली. याशिवाय खाडी किनाऱ्यावर लपवून ठेवलेले बेवारस रसायन पोलिसांनी जागीच नष्ट केले.ही कारवाई पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजू सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. अवैध दारूमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असून अशा धंद्यांची माहिती पोलिसांना देण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.



रायगड जिल्ह्यात किनारपट्टी भागात खाडी किनाऱ्याचा फायदा घेत हातभट्टीचे अड्डे मोठ्या प्रमाणात सुरू असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. विषारी रसायनांपासून बनवलेल्या या दारूमुळे अनेकांना आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. काही ठिकाणी तर दृष्टी जाणे आणि जीवितहानीच्या घटनाही यापूर्वी घडल्या आहेत.या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षकांनी जिल्हाभरात अवैध दारू विरोधी विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिले आहेत. श्रीवर्धन, म्हसळा, मुरुड या तालुक्यांमध्ये यापुढे अशा धंद्यांवर नियमित छापे टाकण्यात येणार असून गावपातळीवर पोलीस पाटील आणि ग्रामसुरक्षा दलाच्या मदतीने माहिती गोळा केली जाणार आहे. नागरिकांनीही अशा बेकायदेशीर धंद्यांची माहिती बिनधास्तपणे पोलिसांना द्यावी, जेणेकरून तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यातून वाचेल, असे आवाहन श्रीवर्धन पोलिसांनी केले आहे.

## खालापुरात अल्पवयीन मुलगी गर्भवती; आरोपीवर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात अल्पवयीन माता आणि बालविवाहप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिल्या घटनेत डोणवत येथील अल्पवयीन मुलीला आरोपी शामसुंदर मनोगी दास (रा. उत्तर प्रदेश) याने लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध ठेवले. पीडिता गर्भवती राहून ९ ऑक्टोबर रोजी तिची प्रसूती झाली. याबाबत पीडितेच्या अज्ञानपणाचा फायदा घेतल्याप्रकरणी आरोपी शामसुंदरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सोपान रासकर करीत आहेत. दुसऱ्या घटनेत धारणी कातकरी वाडी येथे बालविवाहानंतर अल्पवयीन पीडित मुलगी पाच महिन्यांची गरोदर राहिली. या प्रकरणात तिचा पती, पीडितेची आई निरा रघुनाथ पवार, पीडितेची सासू निर्मला भीम वाघे (रा. धारणी कातकरीवाडी) यांच्याविरुद्ध खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे करीत आहेत.

## पुणे पदवीधर निवडणुकीसाठी यशोधरा गोडबोले प्रचारकपदी

**माणगाव : प्रतिनिधी**

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रकांत पाटील, मुरलीधर मोहोळ, माजी खासदार धैर्यशील पाटील, आमदार चित्रा वाघ यांच्या सूचनेनुसार पुणे येथील खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या पदवीधर निवडणुकीसाठी माणगाव येथील भाजपच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या तथा प्रदेश सचिव यशोधरा गोडबोले यांची प्रचारक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यशोधरा गोडबोले यांची पुणे जिल्ह्यात भाजपकडून प्रचारक म्हणून नियुक्ती करण्यात आल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



यशोधरा गोडबोले या भाजपच्या माणगाव तालुक्यातील सक्रिय कार्यकर्त्या असून पक्षाच्या ध्येय-धोरणाप्रमाणे त्या पक्षाचे काम करीत असून केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना लोकांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असतात. त्याचबरोबर पक्षाच्या माध्यमातून विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम त्या राबवित असतात. शिवाय महिलांना संघटित करून महिलांसाठी विविध उपक्रम राबवित असतात. त्यांची पक्षात काम करण्याची पद्धत व एक अनुभवी महिला याकडे लक्ष देत भाजप नेतृत्वाने त्यांच्यावर पुणे खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रचारक म्हणून महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे.

## उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या नवरात्र मंडळांना भेटी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीचे उपनगराध्यक्ष व जिल्हा उपाध्यक्ष विक्रम साबळे यांनी खोपोली शहरातील विविध नवरात्र उत्सव मंडळांना भेटी देऊन कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविला. खोपोली नगरपालिका हद्दीतील लोहोप (लव्हेज) गावातील जय भवानी मित्र मंडळाच्या वेशभूषा कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून विक्रम साबळे उपस्थित राहिले.

त्यांनी कार्यकर्ते व वेशभूषा सादर करणाऱ्या कलाकारांचे कौतुक केले. अशा छोट्या-छोट्या कार्यक्रमांतून कलाकारांची निर्मिती होत असते, यासाठी अशा कार्यक्रमांचे नेहमी आयोजन करावे, असे आवाहन त्यांनी मंडळांना केले. या कार्यक्रमाला नगरसेविका भाजपच्या अश्विनी अत्रे, सानिया शेख, शिवसेनेच्या श्रुती पालांडे, भाजप शहराध्यक्ष अजय इंगुलकर, भाजप शहर सरचिटणीस विनायक माडपे, सामाजिक कार्यकर्ते नरेश पालांडे, तसेच भाजपचे कार्यकर्ते, मंडळाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## सृष्टी मुंबईकर नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित

**उरण : बातमीदार**

महिलांच्या अंगभूत कौशल्याचा, त्यांच्या संघर्षमय प्रवासाचा सन्मान करणारा आणि नव्या पिढीला प्रेरणेची दिशा देणारा 'नवदुर्गा सन्मान सोहळा २०२६' उरण येथे गुरुकुल ॲकॅडमी आणि आधार फाउंडेशन सार्वजनिक नवरात्र उत्सव २०२६ यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध करून समाजाच्या उन्नतीसाठी आपला वेळ, ऊर्जा आणि नेतृत्व समर्पित करणाऱ्या महिलांचा अर्थात नवदुर्गांचा सन्मान करण्यात आला.

त्यात रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्याची शान आणि वेश्वी गावचा अभिमान असलेल्या आगरी लेक, सागरीकन्या कु. सृष्टी राजश्री राजेंद्र मुंबईकर हिचा विशेष गौरव करण्यात आला. मेरीटाइम क्षेत्रातील मर्चंट नेव्हीमधील जागतिक दर्जाच्या मर्स्क कंपनीने १३५ वर्षांनंतर पहिल्यांदाच मुलींना प्राधान्य दिले. संपूर्ण देशभरातून ४,५०० मुलींमधून ३९ मुलींची निवड करण्यात आली, त्यात अथांग सागराला गवसणी घालणाऱ्या रायगडच्या सागरीकन्या सृष्टी मुंबईकर हिची निवड झाली.



अशा सागराला गवसणी घालणाऱ्या कर्तृत्वातून अभूतपूर्व यश संपादन करून जागतिक दर्जाच्या मर्स्क कंपनीच्या जहाजावर गेल्या दोन वर्षांत आपली ड्युटी बजावताना आतापर्यंत चीन, हाँगकाँग, सिंगापूर, मलेशिया, व्हिएतनाम, आफ्रिका, युरोप, लंडन, अमेरिका, न्यूयॉर्क अशा अनेक देशांची भ्रमंती केली असून, सध्या ती न्यूयॉर्क, अमेरिका येथे आपली ड्युटी बजावत आहे.म्हणूनच सृष्टी मुंबईकर हिच्या या कर्तृत्ववान उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन उरण नगर परिषदेच्या नवनिर्वाचित कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर यांच्या पुढाकारातून गुरुकुल ॲकॅडमी तसेच आधार सावली फाउंडेशन सार्वजनिक नवरात्र उत्सव यांच्या सौजन्याने 'नवदुर्गा सन्मान २०२६' हा मानाचा पुरस्कार शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन खऱ्या अर्थाने या नवदुर्गेचा सन्मान करण्यात आला. सृष्टीच्या वतीने तिचे आई-वडील राजू मुंबईकर आणि राणीताई मुंबईकर यांनी पुरस्कार स्वीकारून समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या आपल्या लेकीच्या कर्तृत्वाला सलाम केला.

## एकवीरा मित्र मंडळाच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद



**खोपोली : प्रतिनिधी**

एकवीरा मित्र मंडळ आयोजित मुगलवाडी नवरात्र उत्सवात रक्तदान शिबिर आयोजित करून मंडळाने सामाजिक बांधिलकी जोपासली. या शिबिरात एकूण ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिराला प्रतिसाद मिळाल्याचे मंडळाचे अध्यक्ष अमित पाटील यांनी सांगितले.

समर्पण ब्लड बँक, घाटकोपर यांच्या सहकार्याने हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अमित पाटील, उपाध्यक्ष कल्पेश लोवंशी, खजिनदार सचिन पाटील, नगरसेवक किशोर पाटील, समीर पाटील, राहुल खेडेकर, मयूर देशमुख, अनिकेत कदम, प्रवीण फर्नांडो, सुनील जाधव, तुषार कदम, रोशन लोवंशी, मंदार पाटील, विघ्नेश देशमुख आदी कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.

पान १ वरुन

### संघटनात्मक तयारीचा घेतला आढावा

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने आपापसात उत्तम समन्वय राखून आणि दिलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडत भाजप संघटनेची ताकद अधिक भक्कम करावी, असे आवाहन केले.

भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा क्रांती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड, भाजप कामोठे मंडळ अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे नगरसेवक विकास घरत, मंडळ उपाध्यक्ष नाना जरग, ओबीसी मोर्चाचे मंडळ अध्यक्ष भाऊ भगत, चिटणीस जयकुमार डिगोळे, वसई-विरारचे नगरसेवक गणेश पाटील, दौलतराव आहेर शिक्षण संस्थेचे विश्वस्त वीरेंद्र गुजर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'मराठी माझी देवालाही आवडे'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याच्या निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित केला आहात, त्याबद्दल आयोजकांचे मनःपूर्वक अभिनंदन. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांचे मी विशेषत्वाने आभार मानतो की, त्यांनी या बहारदार कार्यक्रमासाठी पनवेल नगरीची निवड केली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पनवेलमध्ये मराठी साहित्य संमेलन होणार असल्याचे नमूद केले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी आपले मनोगत व्यक्त करताना महापौर नितीन पाटील म्हणाले की, खऱ्या अर्थाने दशकपूर्तीच्या निमित्ताने होणाऱ्या सन्मानाचे खरे हक्कदार आमदार प्रशांत ठाकूर आहेत. महापालिकेच्या निर्मितीमध्ये त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. महापालिकेची निर्मिती झाल्यामुळे आज पनवेलच्या विकासाचा आलेख उंचावलेला असून अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आगामी काळात पनवेलकरांच्या सेवेसाठी येऊ घातले आहेत.

या कार्यक्रमाला नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, सांस्कृतिक कार्य विभागाचे अधीक्षक आबासाहेब जगताप, पनवेल तालुका पत्रकार विकास मंचचे सल्लागार माधव पाटील, अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार डॉ. संजय सोनावणे, संजय कदम, मंदार दोंदे, सरचिटणीस हरेश साठे, खजिनदार दत्ता कुलकर्णी, प्रवीण मोहोकर, नितीन कोळी, निलेश सोनावणे, लालचंद यादव उपस्थित होते.

## आशा सेविकेचा अपघाती मृत्यू

**पोलादपूर** : वाकण येथील आशा सेविका होंडा स्कूटरवरून घराकडे जाताना पोलादपूर-महाबळेश्वर मार्गावर अपघातात जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी पनवेल येथे पाठविण्यात आले असता रुग्णवाहिकेत मृत्यू झाला. वनिता सीताराम साने (वय ५१) असे मयत महिलेचे नाव असून रानबाजिरे गावाच्या हद्दीत अपघात झाल्यानंतर त्यांच्यावर पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले आणि पनवेलला पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. रुग्णवाहिकेतून माणगावदरम्यान गेले असताना त्यांना जोरदार धाप लागली आणि अस्वस्थ वाटू लागल्याने रुग्णवाहिकेतील डॉक्टरांनी तपासणी केली असता त्यांना मृत घोषित करण्यात आले.

## प्रतापगडावर शिवशौर्याचा तेजोमय जागर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड आणि सातारा जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील शिवशौर्याचा वारसा सांगणाऱ्या प्रतापगडावर देवी भवानीआईच्या स्थापनेला ३६७ वर्षे पूर्ण झाली. गेल्या १६ वर्षांपासून सुरू असलेल्या मशाल महोत्सवाचे यंदाचे १७ वे वर्ष ३६७ मशालींच्या तेजोमय शिवशौर्याच्या जागराने साजरे झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यावरील संकट असलेल्या अफझलखानाचा कोथळा काढून ढोरप्याच्या डोंगराचे बांधकाम करून किल्ल्यात रूपांतर केले आणि या शिवप्रतापाची आठवण प्रतापगड या नावाने अजरामर केली.







प्रतापगडावर गंडकी नदीतून आणलेल्या पाषाणापासून घडविलेल्या आई भवानी मातेच्या मूर्तीची स्थापना केली. आई भवानी मातेच्या स्थापनेला ३६७ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने रात्री ३६७ मशाली प्रज्वलित करून १७ वा मशाल महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत पेटलेल्या मशालींनी अवघा प्रतापगड आणि परिसर प्रकाशमय झाला.ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने संपूर्ण गडावर देवीआईच्या पालखीची गडप्रदक्षिणा मिरवणूक निघाली. यामुळे शिवकाळ अवतरल्याचा अनुभव मशाल महोत्सवानिमित्त आधुनिक काळातील शिवभक्त मावळे आणि भवानीदेवीआईचे हजारो भक्त घेत होते.

आई भवानी मातेच्या स्थापनेला २०१० मध्ये ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ३५० मशालींनी मशाल महोत्सवाची परंपरा सुरू करण्याची संकल्पना श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले आणि राजमाता श्रीमंत कल्पनाराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली, शिवकालीन खेडेगावचे संस्थापक संचालक आप्पासाहेब उतेकर यांच्या पुढाकारातून साकारण्यात आली.

# रायगड जिल्ह्यात पावसाची तूट; १५पैकी १२ तालुक्यांत भूजल पातळी खाली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भूजल सर्वेक्षण विभागाच्या अहवालाने रायगड जिल्ह्यातील चिंताजनक चित्र समोर आले आहे. सप्टेंबर २०२६ अखेरच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यातील १५ पैकी १० तालुक्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला असून त्याचा थेट परिणाम भूजल पातळीवर झाला आहे. जिल्ह्यातील १२ तालुक्यांमध्ये भूजल पातळी खालावली आहे.

गेल्या पाच वर्षांच्या तुलनेत अलिबाग, कर्जत, महाड, म्हसळा, मुरुड, पनवेल, पेण, रोहा, श्रीवर्धन, तळा आणि उरण या ११ तालुक्यांत ० ते १ मीटरपर्यंत घट झाली आहे, तर पोलादपूर तालुक्यात १ ते २ मीटरने भूजल खाली गेले आहे. विशेष म्हणजे खालापूर, माणगाव आणि



सुधागड या केवळ तीन तालुक्यांतच भूजल पातळीत वाढ दिसून आली आहे.पर्जन्यमानाचा विचार करता कर्जत, खालापूर, महाड, म्हसळा, पेण, पोलादपूर, रोहा, सुधागड, तळा या नऊ तालुक्यांत २० टयांपर्यंत तूट आहे, तर श्रीवर्धनमध्ये २० ते ३० टक्के तूट नोंदवली गेली आहे.

यामुळेच श्रीवर्धन तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश झाला असून भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. दुसरीकडे अलिबाग, माणगाव, मुरुड, पनवेल आणि उरण या पाच तालुक्यांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस होऊनही माणगाव वगळता इतर चार तालुक्यांत भूजल पातळी वाढण्याऐवजी घटलीच आहे. त्यामुळे केवळ पावसावर अवलंबून न राहता सिमेंट काँक्रिटीकरणाला आळा घालणे, भूजल उपशावर नियंत्रण आणि जलपुनर्भरणावर भर देण्याची गरज निर्माण झाली आहे.

रायगड जिल्हा हा मुंबई–पुणे या दोन महानगरांच्या कुशीत वसलेला असून गेल्या काही वर्षांत येथे औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे. विशेषतः पनवेल, उरण, खालापूर, पेण या तालुक्यांमध्ये मोठ्या गृहप्रकल्पांमुळे आणि एमआयडीसीच्या विस्तारामुळे भूजलाचा उपसा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी सिमेंटच्या जंगलामुळे वाहून जात असल्याने भूजल पुनर्भरण होत नसल्याचे भूजल तज्ज्ञ सांगतात.शेतीच्या दृष्टीनेही ही परिस्थिती गंभीर आहे.

रायगड हा भाताचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. मात्र सलग दोन वर्षे पावसात तूट आल्याने खरीप हंगाम धोक्यात आला आहे. श्रीवर्धन, म्हसळा, तळा या किनारपट्टी भागात खाडीचे खारे पाणी विहिरींमध्ये शिरण्याची भीतीही वाढली आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने आता 'जलयुक्त शिवार' आणि 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

## सुरक्षा रक्षकांचे दिवाळी अनुदान ३० ऑक्टोबरपूर्वी देण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्ह्यातील सुरक्षा रक्षकांना दिवाळी सानुग्रह अनुदानाची रक्कम ३० ऑक्टोबरपूर्वी त्यांच्या बँक खात्यात जमा करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनने रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडे केली आहे. यासंदर्भात युनियनच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांना निवेदन देण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीपूर्वी अनुदानाचे वाटप झाल्यास सुरक्षा रक्षकांना कुटुंबासोबत सण साजरा करण्यासाठी आर्थिक मदत होईल.

असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. १०७० सुरक्षा रक्षकांच्या हितासाठी ही मागणी करण्यात आली असून मंडळाने अनुदान वितरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन युनियनने केले आहे. युनियनचे संस्थापक अध्यक्ष संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हाध्यक्ष मंगेश पाटील, जिल्हा उपाध्यक्ष विलास मोरे, जिल्हा सरचिटणीस विनायक गांधी आणि ग्रामीण विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील भोईर यांनी या मागणीसाठी पुढाकार घेतला आहे.

## मूर्ती विटंबनेप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** पारगाव येथील मंदिरातील मूर्तीची विटंबना करून गदा मंदिरासमोरील तलावात फेकून दिल्याप्रकरणी मोहम्मद रहीसूलानिषा जैद (रा. पारगाव, मूळ बस्ती, उत्तर प्रदेश) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहम्मद जैदने १६ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसहाच्या सुमारास हिंदू धर्माचा अपमान करण्याच्या उद्देशाने पारगाव येथील मंदिरातील मूर्तीवर रांगोळी फेकून तिची विटंबना केली, तसेच गदा मंदिरासमोरील तलावात फेकून दिली आणि मंदिरातील पूजेचे साहित्य विस्कटून नुकसान केले. याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच पोलिसांनी आरोपी मोहम्मद जैद याला अटक केली.

# महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते कलश ज्वेलर्सच्या दुसऱ्या शोरूमचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदेश्वर, कामोठे येथील प्रसिद्ध कलश ज्वेलर्सच्या दुसऱ्या भव्य शोरूमचे उद्घाटन शनिवारी (दि. १७) पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. खांदेश्वर रेल्वे स्थानकासमोर सुमारे अडीच हजार चौरस फुटांच्या प्रशस्त जागेत हे आकर्षक दालन सुरू करण्यात आले आहे. या सोहळ्याला राजकीय, सामाजिक, व्यावसायिक, पोलीस प्रशासन आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून राजपूत कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या.

कलश ज्वेलर्सचे संचालक केशरसिंग राजपूत, जयसिंग राजपूत आणि नरेश राजपूत यांच्या पुढाकारातून या नवीन शोरूमची उभारणी करण्यात आली आहे. ग्राहकांना विविध प्रकारचे सुवर्णालंकार, आकर्षक डिझाइन्स आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या दालनामुळे कामोठे, खांदा कॉलनी, नवीन पनवेल आणि परिसरातील ग्राहकांना दागिन्यांच्या खरेदीसाठी आणखी एक उत्तम पर्याय उपलब्ध झाला आहे. उद्घाटनप्रसंगी महापौर नितीन पाटील यांनी राजपूत कुटुंबीयांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

नवीन शोरूमच्या माध्यमातून ग्राहकांचा विश्वास संपादन करून व्यवसायाची यशस्वी वाटचाल सुरू ठेवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. उरणचे आमदार महेश बालदी यांनीही नवीन दालनाच्या शुभारंभाबद्दल राजपूत कुटुंबीयांचे अभिनंदन केले आणि त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कलश ज्वेलर्सचे मार्केटिंग आणि लीगल हेड प्रदीप इंगळे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

सोहळ्याला माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशनचे उपाध्यक्ष नगरसेवक परेश ठाकूर, अमेरिकेतील पीस ॲम्बेसेडर समीर जगे, कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती देशमुख, नगरसेवक तथा नवीन पनवेल शहर मंडळाचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, नगरसेवक तथा प्रभाग समिती 'क'चे सभापती रवींद्र जोशी, नगरसेवक प्रदीप भगत, नगरसेवक तथा महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य हॅप्पी सिंग, माजी उपमहापौर तथा नगरसेविका सीताताई पाटील आणि माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील उपस्थित होते.

यावेळी कामोठे शिवसेनेचे विभागप्रमुख सुनील गोवारी, पनवेल शहर ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष सतीश पाटील, उत्तर रायगड जिल्हा कामगार आघाडीचे सरचिटणीस मोतीराम कोळी, ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय कुलकर्णी, दिलीप कोरडे, सुरेश म्हात्रे, प्रमोद भोईर, मांजरेकर, संजीव मलगे आणि अरुण भालेराव यांसह खांदा कॉलनीतील केबीसी टीमचे सदस्य व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



## बाजारातून समया चोरणाऱ्यास अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल कापड बाजारातील महालक्ष्मी मेटल मार्टमधून गर्दीचा फायदा घेत ३० हजार रुपये किमतीच्या दोन मोठ्या पितळी समया चोरी करणाऱ्या दोघांपैकी एका आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे. अर्जुन गायकवाड (३५, रा. अंबरनाथ) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे.

याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी एका आरोपीला अटक करून गुन्हा उघडकीस आणला आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. सदर तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस नाईक अनिल चव्हाण, पोलीस शिपाई साईनाथ मोकल, अभिजित गडकरी, दत्ता जाधव, सचिन कोर तसेच महिला पोलीस शिपाई भगत आणि सवार यांनी केला.

## रोख रकमेसह मोटरसायकलची चोरी

**नवीन पनवेल :** हॉटेलमधील मॅनेजरने चेकद्वारे रोख रक्कम काढून अपहार केल्याप्रकरणी तसेच मोटरसायकल चोरून नेल्याप्रकरणी लकी कुमार मिश्रा याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात १६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी यांनी आरोपी लकी कुमार मिश्रा याला त्यांच्या मालकीच्या अतिथी एजंट्स हॉटेल, कामोठे सेक्टर ६ येथे हॉटेल मॅनेजर म्हणून नोकरीवर ठेवले होते. त्याच्यावर आर्थिक व्यवहार आणि व्यवस्थापनाची जबाबदारी देण्यात आली होती, मात्र आरोपीने बँकेच्या चेकमधून चार लाख रुपये काढले, तसेच हॉटेलच्या कॅश काउंटरमधून मोबाईल आणि ७५ हजार रुपये रोख रक्कम तसेच मोटरसायकल घेऊन अपहार केला.

## लोखंडी रॉडने मारहाण

नवीन पनवेल : दारू पिऊन कामावर येण्यास मनाई केली असता लोखंडी रॉडने मारहाण केल्याचा प्रकार कळ्हे गाव येथे घडला. याप्रकरणी विनोद श्रावण पवार (रा. आखाडवाडी, कळ्हे गाव) याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनोद पवारला दारू पिऊन कामावर येण्यास रमेश वाघमारे यांनी मनाई केली होती. त्या रागातून विनोदने लोखंडी रॉडने रमेश यांना मारहाण केली. त्यात त्यांच्या डाव्या हाताला फ्रॅक्चर झाले.

# उलवेमधील कुलस्वामिनीच्या दर्शनासाठी भाविकांची होतेय गर्दी





**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या नऊ वर्षांपासून अविरत सुरू असलेल्या उलवेची कुलस्वामिनी नवरात्रोत्सवात दरवर्षी अनोखे कार्यक्रम राबवून भाविकांना श्रद्धेसह मनोरंजनाची मेजवानी देणारे आम्ही उलवेकर मित्र मंडळ, महिला मंडळ आणि महेश स्पोर्ट्स क्लब, शेलघर हे एका अनोख्या उत्सवासाठी प्रसिद्ध आहे. कोणताही थाटमाट न करता उत्सव साजरा करावा आणि पर्यावरणाचे रक्षण करावे, हा उद्देश ठेवून काम करणाऱ्या या मंडळाने यंदा कागदापासून बनविलेली उलवेची कुलस्वामिनीची प्रतिमा साकारली असून ती पाहणाऱ्या भाविकांना भक्तिमय वातावरणात घेऊन जात आहे.

शनिवारी मंडळातर्फे महिलांसाठी होम मिनिस्टरचा कार्यक्रम पार पडला. अतिशय सुरेख मांडणी करणाऱ्या नितेश पंडित यांचे उपस्थितांनी कौतुक केले. आम्ही उलवेकर मित्र मंडळ, महिला मंडळ आणि महेश स्पोर्ट्स क्लब, शेलघर यांच्या वतीने नवरात्रोत्सव, दिवाळी तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. नवरात्रोत्सवात देवीच्या चरणाशी ठेवल्या जाणाऱ्या साड्या गरीब कुटुंबातील, आदिवासी पाड्यांवरील महिलांना भेट देऊन देवीचा आशीर्वाद म्हणून त्यांचा गौरव केला जातो. दर तीन वर्षांनी उलवेरत्न पुरस्कार सोहळ्याचे आयोजनही या मंडळाकडून करण्यात येते. त्यामुळेच २०२५ च्या नवरात्रोत्सवासाठी पनवेल महानगरपालिकेकडून आम्ही उलवेकर मित्र मंडळाला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. मंडळाचे संस्थापक सचिन राजे येरुणकर आणि मंडळाचे आधारस्तंभ सचिन घरत यांच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविले जात आहेत.

# इन्फिनिटी फाउंडेशनतर्फे नारीशक्तीचा गौरव

### विविध क्षेत्रांतील महिलांचा सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इन्फिनिटी फाउंडेशनच्या ११व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित 'नारी शक्ती सन्मान' सोहळा उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करून त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, कलात्मक आणि सेवाभावी योगदानाचा गौरव करण्यात आला. महिलांच्या कार्याची दखल घेणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि इतर महिलांसाठी प्रेरणादायी व्यासपीठ निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रीतम म्हात्रे तसेच तिलक ज्युनिअर कॉलेज, नेरूळच्या प्राचार्या हीना समानी उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांना 'नारी शक्ती सन्मान' प्रदान करण्यात आला. सांस्कृतिक क्षेत्र, योगशिक्षण, सामाजिक कार्य, संगीत, स्वसंरक्षण प्रशिक्षण, विधी क्षेत्र आणि इतर व्यावसायिक क्षेत्रांत कार्यरत असलेल्या महिलांच्या योगदानाची यावेळी विशेष दखल घेण्यात आली. त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करून समाजातील इतर महिलांनाही प्रेरणा मिळावी, हा या सन्मान सोहळ्यामागील हेतू होता.

यावेळी हीना समानी म्हणाल्या की, अशा सन्मान सोहळ्यांमुळे महिलांना नवी ऊर्जा मिळते आणि त्यांच्या कार्याची समाजाकडून दखल घेतली जाते. आज सन्मानित झालेल्या महिला भविष्यात अनेकांसाठी प्रेरणादायी रोल मॉडेल ठरतील. या कार्यक्रमात इनफिनिटी फाउंडेशनच्या माध्यमातून माय भारत, युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फोटोग्राफी व रील स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. प्रायोगिक शिक्षण संकल्पनेंतर्गत आयोजित या स्पर्धांचा उद्देश तरुणांच्या सर्जनशीलतेला वाव देणे आणि डिजिटल माध्यमांतील कौशल्यांना प्रोत्साहन देणे हा होता.

## 'ड्राइव्ह सेफ ३६०'तून रस्ते सुरक्षेचा संदेश

**पनवेल : वार्ताहर**

रस्ते सुरक्षा, वाहतुकीचे नियम आणि जबाबदार वाहन वर्तनाबाबत जनजागृती करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउनतर्फे 'ड्राइव्ह सेफ ३६०' अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात चार शाळांमधील ९७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. नवीन पनवेल येथील एचडीएफसी सर्कलवर रोटरी स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन, पळस्पे फाटा येथे बालाजी इंग्लिश स्कूल आणि छत्रपती शिवाजी स्कूल, तर रीस (रसायनी) येथे संजीवनी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी फलक, घोषवाक्ये आणि बॅनरच्या माध्यमातून वाहनचालकांना रस्ते सुरक्षेचा संदेश दिला.

हेल्मेटचा वापर, वाहतुकीच्या नियमांचे पालन आणि रस्त्यावर जबाबदारीने वागणे यामुळे अपघात टाळण्यास मदत होते, हा संदेश विद्यार्थ्यांनी दिला. प्रत्येकाचा जीव महत्त्वाचा असून रस्ते सुरक्षा ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे याबाबत या अभियानातून जनजागृती करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउनच्या अध्यक्ष डॉ. जयश्री पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. अभियान यशस्वी करण्यासाठी सहभागी शाळा, शिक्षक आणि यांनी सहकार्य केले, अशी माहिती सचिव ॲड. हितेश राजपूत यांनी दिली.



## संपादकीय

# निसर्गाचा बदलता पॅटर्न

राज्यात सध्या ऑक्टोबर हिटच्या प्रचंड झळा लागत असून तापमानाचा पारा चाळीशीच्या उंबरठ्यावर पोहचला असतानाच दुसरीकडे काही भागांत विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाच्या सरी बरसत आहेत. निसर्गाच्या या परस्परविरोधी आणि लहरी रूपामुळे ऐन सणासुदीच्या काळात सर्वसामान्य नागरिक आणि बळीराजाची मोठी त्रेधातिरपीट उडत आहे.

**सध्या महाराष्ट्रात कमालीची हवामान विविधता पाहायला मिळत आहे. सकाळी पडणारे कडक ऊन, दुपारनंतर अचानक दाटून येणारे ढग आणि संध्याकाळी विजांच्या कडकडाटासह कोसळणारा मुसळधार पाऊस अशा लहरी वातावरणाने ऋतूचक्राचे गणित पार बिघडवून टाकले आहे. ऑक्टोबर महिना हा मुळातच पावसाच्या परतीचा आणि हिवाळ्याच्या आगमनाचा संधिकाल मानला जातो, मात्र यंदाची परिस्थिती काहीशी वेगळी आणि चिंताजनक आहे. मुंबई, पुणे, नागपूर आणि मराठवाड्याच्या काही भागांत तापमानाचा पारा कमालीचा वाढला आहे. उन्हाळ्याच्या तीव्र दिवसांची आठवण करून देणाऱ्या या ऑक्टोबर हिटमुळे दुपारी रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. हा उकाडा असह्य होत असतानाच दुसरीकडे अचानक निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यांमुळे वादळी वारे आणि पाऊस हजेरी लावत आहेत. राज्यातील अनेक भागांत यंदा पावसाने आधीच ओढ दिली होती. अनेक जलप्रकल्प आणि धरणे अद्याप पूर्ण भरलेली नाहीत, ज्यामुळे काही भागांत आधीच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा अत्यंत संवेदनशील काळात निसर्गाने घेतलेली ही नवीन कुस चिंता वाढवणारी आहे. पावसाची ही अनपेक्षित हजेरी आनंदाची नसून चिंतेची ठरत आहे, कारण हा पडणारा पाऊस नियमित मान्सूनचा नसून स्थानिक पातळीवर वाढलेल्या प्रचंड उष्णतेमुळे आणि हवेतील आर्द्रतेमुळे निर्माण झालेल्या ढगांमधून कोसळणारा अवकाळी पाऊस आहे. हा पाऊस जितका अनपेक्षित आहे, तितकाच तो कमी वेळात जास्त तीव्रतेने कोसळणारा आहे. यामुळे पिकांचे नुकसान तर होतेच, पण सोबतीला येणाऱ्या विजांमुळे जीवित व वित्तहानीचा धोकाही वाढतो. निसर्गाच्या या दुहेरी मारामुळे सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला आणि मानवी आरोग्याला बसत आहे. खरीप पिकांची काढणी आणि रब्बीच्या पेरण्यांचा हा महत्त्वाचा काळ असतो. अशा वेळी अचानक येणारा वादळी पाऊस हातात तोंडाशी आलेला घास हिरावून घेतो. सोयाबीन, कापूस आणि फळबागांचे यामुळे मोठे नुकसान होत आहे. एकाच दिवसात अत्यंत उष्ण आणि त्यानंतर लगेच दमट किंवा थंड वातावरण निर्माण झाल्यामुळे मानवी शरीराला या बदलांशी जुळवून घेणे कठीण जात आहे. घरोघरी ताप, सर्दी, खोकला आणि डेंग्यू-मलेरियासारख्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित प्रश्न नसून जागतिक पातळीवर होणाऱ्या हवामान बदलाचा हा थेट परिणाम आहे. समुद्राचे वाढते तापमान आणि जंगलांचे घटते प्रमाण यांमुळे हवामानाचे पारंपारिक चक्र पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पूर्वी ऋतूंचे आगमन आणि निर्गमन ठरलेल्या वेळेत होत असे. आता मात्र, एकाच ऋतूत तिन्ही ऋतूंचा अनुभव येणे ही बाब नित्याची होऊ लागली आहे. निसर्गाचा हा बदलता पॅटर्न आपल्याला इशारा देत आहे की, पर्यावरण संतुलनाकडे आता अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. निसर्गाच्या या लहरीपणाशी मुकाबला करण्यासाठी आता आपल्याला जीवनशैलीत आणि शेती पद्धतीत बदल करावे लागतील. हवामान खात्याच्या अंदाजांचा अचूक वापर करून शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचे नियोजन करणे आवश्यक बनले आहे. नागरिकांनीही अशा बदलत्या वातावरणात आरोग्याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. निसर्गाशी जुळवून घेत, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि पर्यावरणपूरक पावले उचलणे हाच यापुढील काळातील एकमेव शाश्वत मार्ग असेल.**

# वाचनातून ज्ञान समृद्ध समाजाकडे!



अक्षरांशी मैत्री, विचारांना दिशा आणि जीवनाला नवी दृष्टी देणारा वाचनाचा संस्कार! वाचन म्हणजे केवळ अक्षरांची ओळख नव्हे, तर ज्ञानाच्या अथांग विश्वात प्रवेश करण्याचे प्रभावी माध्यम होय. पुस्तकांच्या सहवासातून माणसाचे विचार प्रगल्भ होतात, कल्पनाशक्तीला चालना मिळते आणि जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी प्राप्त होते. वाचन माणसाला केवळ सुशिक्षित बनवत नाही, तर संवेदनशील, विवेकी आणि विचारशील नागरिक घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. म्हणूनच समाजात वाचनाची आवड निर्माण करणे आणि वाचन संस्कृतीचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि युवा पिढीचे प्रेरणास्थान भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. नुकताच तो साजरा झाला. डॉ. कलाम यांचे जीवन म्हणजे ज्ञान, विज्ञान, जिज्ञासा, कठोर परिश्रम आणि स्वप्नपूर्तीचा प्रेरणादायी प्रवास. पुस्तकांच्या सहवासातून मिळणारे ज्ञान व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी महत्त्वाचे असते, हा विचार त्यांच्या जीवनकार्यातून अधोरेखित होतो. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासोबतच समाजात वाचनाची गोडी निर्माण करणे आणि ज्ञानाधिष्ठित समाजाच्या निर्मितीला चालना देणे, हा वाचन प्रेरणा दिनाचा मुख्य उद्देश आहे.

पुस्तके ही माणसाची खरी मित्र असतात. ती आपल्याला भूतकाळातील अनुभवांची ओळख करून देतात, वर्तमानातील प्रश्न समजावून सांगतात आणि भविष्याचा वेध घेण्याची क्षमता विकसित करतात. इतिहास, साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण, आरोग्य, अर्थशास्त्र, समाजशास्त्र अशा विविध विषयांवरील वाचनामुळे ज्ञानाच्या कक्षा विस्तारतात. व्यक्तीच्या विचारप्रक्रियेला चालना मिळते आणि निर्णयक्षमता अधिक सक्षम होते.

आज माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञान मिळविण्याची अनेक साधने उपलब्ध झाली आहेत. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट आणि समाजमाध्यमांमुळे माहिती सहज उपलब्ध होते. मात्र, माहितीचा वेग वाढला असला तरी तिचे आकलन, विश्लेषण आणि योग्य-अयोग्य यातील फरक ओळखण्याची क्षमता विकसित करणे तितकेच महत्त्वाचे आहे. नियमित वाचनामुळे एकाग्रता वाढते, चिकित्सक विचार करण्याची सवय लागते आणि अफवा अथवा चुकीच्या माहितीपासून सावध राहण्याची जाणीव निर्माण होते. त्यामुळे पारंपरिक पुस्तकांसोबतच ई-पुस्तके, डिजिटल ग्रंथालये आणि विश्वासार्ह ऑनलाइन साहित्याचा वापर करून वाचनाची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे.

विद्यार्थिदशा ही व्यक्तिमत्त्व घडविण्याची महत्त्वपूर्ण अवस्था आहे. या काळात वाचनाची सवय लागल्यास विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास होतो. शब्दसंपत्ती वाढते, लेखनशैली सुधारते, आकलनशक्ती विकसित होते आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. अभ्यासक्रमातील पुस्तकांबरोबरच चरित्रे, आत्मचरित्रे, कथा, कादंबऱ्या, विज्ञान विषयक साहित्य आणि प्रेरणादायी पुस्तके वाचल्यामुळे विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाचा विस्तार होतो.

आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ परीक्षेतील गुण मिळविणे पुरेसे नाही. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, संशोधनवृत्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सामाजिक जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. वाचन या सर्व गुणांच्या विकासाला हातभार लावते. त्यामुळे प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात वाचनालय समृद्ध करणे, वाचनाचे तास निश्चित करणे, पुस्तक परिचय उपक्रम राबविणे, कथाकथन, अभिवाचन आणि सामूहिक वाचनाचे आयोजन करणे आवश्यक आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुस्तकांची निवड करण्यासाठी मार्गदर्शन करावे, तर पालकांनी मुलांसोबत नियमित वाचन करून त्यांच्यासमोर आदर्श निर्माण करावा.

मराठी भाषा ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आणि समृद्ध परंपरेचा अमूल्य वारसा आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव यांच्यापासून ते आधुनिक काळातील विविध साहित्यिकांपर्यंत मराठी साहित्याने समाजाला विचारांची दिशा दिली आहे. समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या लेखनातून सामाजिक विषमता, अज्ञान आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. तृतीय रत्न, गुलामगिरी आणि शेतकऱ्याचा असूड यांसारख्या साहित्यकृतींतून त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या साहित्याचे वाचन म्हणजे सामाजिक परिवर्तनाच्या विचारांशी संवाद साधण्याची संधी होय.

मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी मराठीतील दर्जेदार साहित्य अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. नव्या पिढीने मराठी पुस्तके वाचावीत, मराठीत लेखन करावे आणि दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा अभिमानाने वापर करावा. त्याचबरोबर विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, आरोग्य, संगणक आणि आधुनिक संशोधन यांसारख्या विषयांवरील दर्जेदार साहित्य मराठीत उपलब्ध होणे गरजेचे आहे. ज्ञानभाषा म्हणून मराठीचा विकास करण्यासाठी भाषांतर, शब्दसंपदा निर्मिती, विश्वकोश लेखन आणि डिजिटल साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे.

वाचन संस्कृती विकसित करणे ही केवळ शासनाची किंवा शैक्षणिक संस्थांची जबाबदारी नाही. कुटुंब, समाज, साहित्यिक, ग्रंथालये आणि विविध सामाजिक संस्था यांचीही त्यात महत्त्वपूर्ण भूमिका आहे. प्रत्येक घरात छोटेखानी वाचन कोपरा असावा, वाढदिवस आणि अन्य विशेष प्रसंगी भेटवस्तू म्हणून पुस्तके द्यावीत आणि कुटुंबातील सदस्यांनी एकत्रित वाचनासाठी वेळ द्यावा. या छोट्या प्रयत्नांतून वाचनाची सवय जीवनाचा अविभाज्य भाग बनू शकते.

चला, वाचनाला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवूया! पुस्तकांशी मैत्री करूया, मराठी भाषेचा अभिमान जपूया आणि ज्ञान, विवेक व संस्कारांनी समृद्ध समाजाच्या निर्मितीसाठी वाचन संस्कृतीचा दीप प्रत्येक घरात प्रज्वलित करूया!

**-अलका पाटील,** उपसंपादक,
जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली

# खोपोली नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे



कमी वयातच समृद्ध राजकीय आणि सामाजिक वारसा यशस्वीपणे पुढे नेणारे, खोपोली नगर परिषदेचे सर्वात तरुण उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांचा आज वाढदिवस आहे. आपल्या समाजकार्याने त्यांनी अतिशय कमी कालावधीत खोपोलीकरांच्या मनात स्वतःचे एक हक्काचे स्थान निर्माण केले आहे.

विक्रम साबळे यांचे आजोबा लक्ष्मण मल्हारी साबळे यांनी खोपोली नगर परिषदेचे कार्यक्षम नगराध्यक्ष म्हणून शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आणि काशी होम्स प्रा.लि.चे यशवंतशेठ साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विक्रम साबळे जनसेवेचे व्रत पुढे चालवत आहेत. खोपोलीच्या राजकारणात यशवंतशेठ साबळे 'किंगमेकर' म्हणून ओळखले जातात.

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विक्रम साबळे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. आज ते प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. खोपोली नगर परिषदेच्या माध्यमातून नागरिकांचे प्रलंबित प्रश्न सोडवून त्यांनी जनतेमध्ये मोठा विश्वास निर्माण केला आहे. त्यांच्या याच लोकप्रियतेमुळे आज खोपोली शहरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांना उदंड आणि निरोगी आयुष्याच्या अनंत शुभेच्छा!

**-दीपक जगताप,** खालापूर



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोन कॅमेरा आणि माईकद्वारे हेरगिरी

डिजिटल युगात, स्मार्टफोन वापरकर्त्यांना गोपनीयतेचे उल्लंघन आणि डेटा चोरीचा धोका असतो. अनेक संशोधनांमधून असे दिसून आले आहे की स्मार्टफोन कॅमेरा, मायक्रोफोन आणि सर्च हिस्ट्री अशा वेगवेगळ्या मार्गांनी तुमची हेरगिरी करू शकतो.




अनेक स्मार्टफोन वापरकर्त्यांना असे वाटते की जर ते एखाद्या उत्पादनाबद्दल बोलले तर त्यांचा फोन त्याच उत्पादनाच्या जाहिराती दाखवू लागतो.

अशा परिस्थितीत, प्रश्न असा उद्भवतो की तुमचा स्मार्टफोन तुमचे ऐकत आहे की नाही हे कसे शोधायचे? स्मार्टफोनच्या कोणत्या सेटिंग्जद्वारे हेरगिरी रोखता येते? या बातमीत आम्ही तुम्हाला या सेटिंग्जबद्दल सांगत आहोत.

**या सेटिंग्जद्वारे हेरगिरी नियंत्रित करा**

तुमच्या स्मार्टफोनवरील अनेक ॲप्लिकेशन्सना तुमचा कॅमेरा, मायक्रोफोन आणि स्टोरेजमध्ये प्रवेश असतो. याद्वारे कोणताही ॲप तुमचे संभाषण ऐकू शकतो. हे टाळण्यासाठी, तुम्हाला तुमचा प्रवेश मर्यादित करावा लागेल किंवा फक्त निवडक परवानग्या द्याव्या लागतील.

**ॲप परवानग्या व्यवस्थापित करा**

तुमच्या फोनच्या सेटिंग्जमधील सुरक्षा आणि गोपनीयता पर्यायावर जा. येथे तुम्हाला प्रायव्हसीचा पर्याय मिळेल. त्यावर क्लिक करून परमिशन मॅनेजरवर जा. येथे सर्व ॲप्लिकेशन्सचा मायक्रोफोन ॲक्सेस दाखवला जाईल. तुमच्या गरजेनुसार ते व्यवस्थापित करा.

**सॉफ्टवेअर अपडेट ठेवा**

तुमच्या फोनचे सॉफ्टवेअर आणि ॲप्स अपडेट ठेवा. तुमच्या फोनचा सुरक्षा पॅच दर महिन्याला अपडेट करा.

**व्हॉइस असिस्टंट अक्षम करा**

फोनवर सिरी, गुगल असिस्टंट किंवा अलेक्सा सारखे व्हर्च्युअल असिस्टंट बंद करा. यामुळे फोनमध्ये आवाज ऐकणे टाळता येते.

**असुरक्षित सार्वजनिक वाय-फाय वापरणे टाळा**

सार्वजनिक वाय-फाय नेटवर्क आणि हॉटस्पॉट्स हॅकिंगचे साधन बनू शकतात. हे टाळण्यासाठी, असुरक्षित सार्वजनिक वाय-फाय वापरताना तज्ञछ वापरा.

**थर्ड पार्टी ॲप्सचे निरीक्षण करा**

अज्ञात थर्ड पार्टी ॲप्स डाउनलोड करणे टाळा. फक्त अधिकृत ॲप स्टोअरमधून ॲप्स इन्स्टॉल करा. इंस्टॉलेशननंतर, ॲप्सना फक्त आवश्यक परवानग्या द्या.

# समाजसुधारक पांडुरंगशास्त्री आठवले



## निमित्त

पांडुरंगशास्त्री आठवले हे तत्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९२० रोजी रोहे या कोकणातील गावी झाला. पारंपरिक शिक्षणाबरोबर 'सरस्वती संस्कृत पाठशाळेत' संस्कृत व्याकरणाबरोबर न्याय, वेदान्त, साहित्य, त्याचबरोबर इंग्लिश भाषा साहित्याचा अभ्यास त्यांनी केला. वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे यावर चिंतन केले. त्यांनी हिंदू धर्मातील जाचक चातुर्वर्ण्य पद्धतीचा निषेध केला, त्याग केला.

१९५४मध्ये जपान येथे झालेल्या दुसऱ्या धार्मिक परिषदेत त्यांनी वेद आणि भगवद्गीतेवरील तत्त्वज्ञानावर भाषण केले. त्यानंतर त्यांना परदेशात स्थायिक होण्याच्या अनेक संधी आल्या, पण त्यांनी त्या नम्रपणे नाकारल्या. वास्तव जीवन आणि भगवद्गीतेची शिकवण यांची सांगड घालण्यासाठी तत्त्वज्ञान विद्यापीठाची कल्पना त्यांच्या मनात आली. तरुणांनी भगवद्गीतेची तत्वे वास्तविक जीवनात आचरणात आणावीत, म्हणून त्यांनी या विद्यापीठात दोन अभ्यासक्रम सुरू केले.

आपल्या क्रांतिकारी 'स्वाध्याय' चळवळीची सुरुवात त्यांनी १९५८मध्ये गुजरातमधील सौराष्ट्र विभागात केली. बघताबघता या चळवळीला एका खूप मोठ्या 'परिवारा'चे स्वरूप प्राप्त झाले. लाखो गरीब, मध्यमवर्गीय आणि श्रीमंत वर्गातील तरुण मुले-मुली आणि स्त्री-पुरुष यात सामील झाले. हे सर्व जण जाती-धर्मांच्या भिंती तोडून ईश्वरी प्रेमाचा साक्षात्कार घडवू लागले. मुख्यत: गुजरात आणि महाराष्ट्रातील सुमारे एक लाख गावांपर्यंत ही चळवळ पोहोचली. स्वाध्याय परिवाराने सहकारी तत्त्वावर शेती, मासेमारी आणि वृक्ष लागवड अशा अनेक योजना यशस्वीरीत्या राबविल्या.

सुरुवातीला काही गावांमध्ये सुरू झालेली चळवळ चार दशकांत अमेरिका, इंग्लंड, आफ्रिकेपर्यंत पसरली. व्यसनमुक्ती, सामाजिक जबाबदारीचे भान, पर्यावरणसंवर्धन आणि स्वकष्टाने आत्मसन्मान जागवून समानता निर्माण करण्याचा मंत्र या सूत्रांवर त्यांच्या स्वाध्याय चळवळीचा पाया उभा राहिला. शेतकरी बंधूंच्या मुलांसाठी त्यांनी सहा कॉलेजेस काढली. 'योगेश्वर कृषी'सारख्या उपक्रमातून सामूहिक शेतीचा मंत्र त्यांनी दिला. अशा या द्रष्ट्या तत्वज्ञाचे २५ ऑक्टोबर २००३ रोजी निधन झाले.

१९९१मध्ये श्याम बेनेगल यांनी आठवले यांच्या स्वाध्याय चळवळी किंवा प्रयोगांवर आधारित अंतरनाद (द इनर व्हॉईस) हा चित्रपट तयार आणि दिग्दर्शित केला, ज्यात शबाना आझमी आणि कुलभूषण खरबंदा यांच्या प्रमुख भूमिका होत्या. २००४मध्ये अबीर बजाझ यांनी आठवले यांच्या जीवनावर आणि कार्यांवर आधारित स्वाध्याय या लघुपटाचे दिग्दर्शन केले.

इ.स. १९९२मध्ये त्यांना टिळक पुरस्कार मिळाला. तो पुरस्कार देतांना तेव्हाचे राज्यपाल चिदंबरम सुब्रमणियम म्हणाले होते, विद्वत्ता आणि दैवी शक्तीचा संगम झाल्यावरच समाजाचे आणि देशाचे हित सुरक्षित राहते. पांडुरंगशास्त्री आठवले यांची शिकवण सर्व समाजाने आचरण्यात आणण्याची गरज आहे. पांडुरंगशास्त्री हे आजच्या युगातील देदीप्यमान आशेचा किरण आहेत. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# योग्य आहार घेतल्यावरही वाढतंय वजन? वाचा कारणे

आपण सुंदर, आकर्षक दिसावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. पण सतत वजन वाढत असल्यामुळे आत्मविश्वास कमी होतो. शिवाय वजन वाढत असल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. वजन जास्त असल्यास थोडं काम केलं तरी थकवा जाणवतो. चालताना किंवा पायऱ्या चढताना श्वास लागणे, स्नायू आणि सांधे दुखणे.. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, अयोग्य आहार हे वजन वाढण्यामागे कारण मानले जाते, ज्यामुळे शरीरात चरबी वाढू लागते.



सुस्त लाईफ स्टाइलमुळेदेखील वजन वाढू शकते. सुस्त लाईफ स्टाइल म्हणजे शारीरिक श्रम कमी करणे. एका जागी बसून ज्या लोकांचे काम असते. त्यांचे वजन लवकर वाढते. कायम ७-८ तास एकाच जागी काम केल्यामुळे शारीरिक हलचाल होत नाही. त्यामुळे रोज व्यायम करणं गरजेचं असतं. रोज सकाळी किंवा संध्याकाळ व्यायाम, जॉगिंग, चालणे इत्यादी करायला सुरुवात करा. याशिवाय ऑफिस किंवा घरात लिफ्टऐवजी जिने वापरा. दर १ तासाने किंवा दिवसातून ४० मिनिटांनी काही मिनिटांचा ब्रेक घ्या.

हार्मोनल असंतुलनामुळेदेखील वजन वाढू शकतं. थायरॉईडची लेव्हल असंतुलित असल्यास, मेटाबॉलिज्म मंदाऊ शकतो, ज्यामुळे वजन वाढू लागते. याशिवाय काही वेळा शरीरात इन्सुलिनचा योग्य वापर होत नसेल तर ही साखर फॅटमध्ये बदलते आणि शरीरात साठू लागते. याशिवाय इस्ट्रोजेन हार्मोनच्या असंतुलनामुळेही वजन वाढू शकते.

शारीरिक दृष्ट्या फिट राहण्यासाठी झोप फार गरजेची आहे. शारीरिला आरामाची गरज असते. योग्य झोप घेतल्यानंतर अनेक आजार दूर होतात. योग्य झोपे नसेल तर वजन वाढू शकते. जेव्हा तुम्हाला योग्य झोप मिळत नाही, तेव्हा हार्मोनल असंतुलन होऊ शकते आणि त्याचा तुमच्या दैनंदिन दिनचर्येवरही परिणाम होतो, ज्यामुळे मेटाबॉलिज्म मंदावण्यास सुरुवात होते आणि शरीराचे वजन वाढू शकते.

काही औषधांमुळे देखील वजन वाढू शकते. काही आजार असेल आणि तुम्ही औषधे घेत असाल तरी वजन वाढते. यावर डॉक्टरांचा सल्ला फार महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार योग्य आहार आणि झोप घ्या आणि स्वतःला फिट ठेवा. काही लोकांमध्ये वजन वाढण्याचे कारण अनुवांशिक असते, म्हणजेच आई-वडील किंवा कुटुंबात कोणी जाड असेल, वजन वाढू शकते. अशा लोकांनी खाण्या-पिण्यापासून ते रोजच्या व्यायामापर्यंत नेहमीच विशेष काळजी घ्यावी.

# रानसई-उचाटमध्ये देवी मंदिर जीर्णोद्धाराचा दसऱ्याला शुभारंभ

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील रानसई-उचाट येथील श्री गावडाई-झोलाई देवीच्या भव्य पाषाणी मंदिराच्या जीर्णोद्धाराचा शुभारंभ विजयादशमीच्या मुहूर्तावर मंगळवारी (दि. २०) आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते होणार आहे.

मंदिराच्या उभारणीसाठी सुमारे तीन कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या उपक्रमामुळे परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्राची वरदायिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोयना धरणामुळे संपूर्ण महाराष्ट्राला प्रकाश देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य झाले असून कोयना प्रकल्पग्रस्तांच्या त्यागातून रानसई-उचाट गाव उभे राहिले आहे. या कार्यक्रमास सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे, अशी विनंती ग्रामस्थांनी केली आहे.

श्री गावडाई झोलाई देवीच्या मंदिराला एक आध्यात्मिक आख्यायिका लाभली आहे. गावाच्या पुनर्वसनाच्या वेळी सुंदराबाई आबाजीराव मोरे या वृद्ध महिलेला देवीचा दृष्टांत झाल्याची आख्यायिका सांगितली जाते. नदीच्या डोहात असलेले दोन पाषाण पुनर्वसनाच्या वेळी सोबत घेऊन जाण्याचा दृष्टांत त्यांना झाला. त्यानुसार त्या काळातील तरुण जयराम बापूजीराव मोरे आणि कै. अर्जुन नरसिंगराव मोरे यांनी हे दोन पाषाण पुनर्वसित गावात आणले. या घटनेतून गावातील ग्रामदैवताविषयीची श्रद्धा आणि परंपरा आजही जपली जात आहे.



# रिलायन्स कंपनीतून साहित्याची चोरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा येथील रिलायन्स कंपनीच्या पी.टी.एस. स्टोअर्समधून अडीच लाख रुपयांचे साहित्य चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

चोरट्यांनी कंपनीच्या स्टोअर्समधून कोणतीही परवानगी न घेता तांब्याची कॉपर ट्युब्स (१० किलो वजन, किंमत १०,००० रुपये), कॉपर वाइंडिंग केबल (२३ किलो वजन, किंमत २३,००० रुपये) आणि डिचार्ज रॉड-६ फूट लांबीचे एकूण ७ नग (किंमत २,१७,००० रुपये) एकूण २ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवला आहे. या प्रकरणी रसायनी पोलीस अधिक तपास करत आहेत.

एम.व्ही.टी.व्ही.

## पाहिजेत : दैनंदिन ठेव प्रतिनिधी

**एम.व्ही.टी.व्ही. सहकारी पतपेढी लि., शाखा : पनवेल**

४७ वर्षांची सहकाराची परंपरा आणि ६०,०००+ सभासदांचा विश्वास. ३५० कोटींहून अधिक व्यवसाय आणि ६ शाखांचे विस्तृत जाळे.

पनवेल व परिसरासाठी दैनिक ठेव संकलन करणाऱ्या प्रामाणिक आणि मेहनती उमेदवारांची आवश्यकता.

**पात्रता :** किमान १० वी किंवा १२ वी उत्तीर्ण

**वयोमर्यादा :** वय वर्षे ६० पर्यंत.

**अनुभव :** पतपेढी किंवा बँकिंग क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांना व स्थानिकांना प्राधान्य.

**फायदे :** आकर्षक कमिशन व प्रगतीची संधी.

इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा व आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष भेट द्यावी.

**पत्ता :** शॉप नं - ३, नील आंगण अपार्टमेंट, प्लॉट नं २९, सेक्टर - १९, न्यू पनवेल, ४१० २०६.

**मोबाईल :** ८६५७४७३५७३/९७६८८८०३१३

**Email ID :** umesh@mvtvccs.com

**वेळ :** सकाळी ९:३० ते ५:३०

# वानिवलीत आई जगदंबेच्या भक्तीचा अखंड जागर



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आई जगदंबेवरील अढळ श्रद्धा, भक्तिभावाची परंपरा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम साधणारा रसायनी पाताळगंगा परिसरातील वानिवली येथील सुनिल बाळू थोरवे आयोजित नवरात्रोत्सव यंदाही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

गेल्या ३६ वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही भक्तीची परंपरा म्हणजे केवळ धार्मिक उत्सव नसून, समाजाला एकत्र आणणारा आणि आनंदाची उधळण करणारा श्रद्धेचा सोहळा ठरत आहे. आई मातेच्या कृपाशीर्वादाने नऊ दिवसांचा हा उत्सव भक्तिमय, प्रसन्न आणि चैतन्यमय वातावरणात पार पडत आहे.नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत आई मातेची मनोभावे पूजा-अर्चा, आरती आणि उपासना करत भक्तांनी देवीच्या चरणी श्रद्धा भक्तीबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्राधान्य देत उत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामुळे धार्मिक वातावरणासोबतच आनंद, उत्साह आणि आपुलकीची भावना सर्वत्र अनुभवायला मिळाली.

### महिलांसाठी खास खेळ; विजेत्यांना आकर्षक भेटवस्तू

या नवरात्रोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे महिलांसाठी आयोजित करण्यात आलेले विविध मनोरंजक आणि उत्साहवर्धक खेळ. महिलांनी मोठ्या उत्साहाने या स्पर्धांमध्ये सहभाग घेणाऱ्याना आकर्षक भेट वस्तू देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या उपक्रमामुळे महिलांना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली, तर उत्सवात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

---

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांचे कार्यालय**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, ५ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
E-mail Id-asistantregistrar३५३@gmail.com

जा.क्र.उनि/ससे/सिडको/क्र.१५४-ब (२९)/ जाहीर नोटीस / ३३७३/२०२६ — दिनांक :- १२/१०/२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब २९ (१) अंतर्गत दाखल दाव्यावरील सुनावणीची जाहीर नोटीस.**

**चेअरमन/सेक्रेटरी,**
**जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.**
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. .... अर्जदार

विरुध्द

**श्री. रामशरण यादव**
शॉप नं. १०१, जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
भुखंड क्र.३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९.. ....जाब देणार

**तुम्हास नोटीस देणेत येते की,**

**१)** अर्जदार संस्थेनी जाबदेणार श्री. रामशरण यादव (शॉप नं.१०१), यांचे विरुध्द थकीत देखभाल शुल्क व इतर शुल्क अशी एकुण **रक्कम रु. ८९,९७७/-** भरण्यात आली नसल्यामुळे कलम १५४ ब २९ अन्वये वसूली दावा दि.०५/०५/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. या कार्यालयामार्फत सदर दिनांक ३१/०७/२०२५ १२/०८/२०२५,०९/०९/२०२५, १०/१०/२०२५, व २९/०९/२०२६, सुनावणीस जाबदेणार श्री. रामशरण यादव हे सतत गैरहजर राहीले असल्याने सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता निश्चित करण्यात येत आहे.

**२)** अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.

**३)** जाब देणार यांनी त्यांच्या बचवासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.

**४)** आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

सही/-
(शंकर पाटील)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई

---

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांचे कार्यालय**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, ५ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
E-mail Id-asistantregistrar३५३@gmail.com

जा.क्र.उनि/ससे/सिडको/क्र.१५४-ब (२९)/ जाहीर नोटीस / ३३७६/२०२६ — दिनांक :- १२/१०/२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब २९ (१) अंतर्गत दाखल दाव्यावरील सुनावणीची जाहीर नोटीस.**

**चेअरमन/सेक्रेटरी,**
**जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.**
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. .... अर्जदार

विरुध्द

**१) श्री.सी. के. राकेश मुदलियार आणि**
**२) श्री. कुष्णकुमार मुदलियार**
पत्ता- शॉप नं.६८, जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९.. ....जाब देणार

**तुम्हास नोटीस देणेत येते की,**

**१)** अर्जदार संस्थेनी जाबदेणार १) श्री. सी. के. राकेश मुदलियार आणि २) श्री. कुष्णकुमार मुदलियार (शॉप नं.५६,), यांचे विरुध्द थकीत देखभाल शुल्क व इतर शुल्क अशी एकुण **रक्कम रु.१,३५,७२९/-** भरण्यात आली नसल्यामुळे कलम १५४ ब २९ अन्वये वसूली दावा दि.०५/०५/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. या कार्यालयामार्फत सदर दि.२६/०६/२०२५,१५/०७/२०२५,,१२/०८/२०२५, १०/१०/२०२५ व २९/०९/२०२६, सुनावणीस जाबदेणार १) श्री.सी. के. राकेश मुदलियार आणि २) श्री. कुष्णकुमार मुदलियार हे सतत गैरहजर राहीले असल्याने सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता निश्चित करण्यात येत आहे.

**२)** अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.

**३)** जाब देणार यांनी त्यांच्या बचवासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.

**४)** आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

सही/-
(शंकर पाटील)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई

---

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांचे कार्यालय**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, ५ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
E-mail Id-asistantregistrar३५३@gmail.com

जा.क्र.उनि/ससे/सिडको/क्र.१५४-ब (२९)/ जाहीर नोटीस / ३३७४/२०२६ — दिनांक :- १२/१०/२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब २९ (१) अंतर्गत दाखल दाव्यावरील सुनावणीची जाहीर नोटीस.**

**चेअरमन/सेक्रेटरी,**
**जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.**
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. .... अर्जदार

विरुध्द

**श्री. गजानंन के तांडेल**
शॉप नं. १९, जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
भुखंड क्र.३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९.. ....जाब देणार

**तुम्हास नोटीस देणेत येते की,**

**१)** अर्जदार संस्थेनी जाबदेणार श्री. गजानंन के तांडेल, (शॉप नं. १९), यांचे विरुध्द थकीत देखभाल शुल्क व इतर शुल्क अशी एकुण **रक्कम रु.१,१८,९१८/-** भरण्यात आली नसल्यामुळे कलम १५४ ब २९ अन्वये वसूली दावा दिनांक २/०७/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. या कार्यालयामार्फत सदर दि.२६/०६/२०२५, १५/०७/२०२५,१२/०८/२०२५, १०/१०/२०२५ व २९/०९/२०२६, सुनावणीस जाबदेणार श्री. गजांनन तांडेल हे सतत गैरहजर राहीले असल्याने सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता निश्चित करण्यात येत आहे.

**२)** अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.

**३)** जाब देणार यांनी त्यांच्या बचवासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.

**४)** आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

सही/-
(शंकर पाटील)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई

---

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांचे कार्यालय**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, ५ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
E-mail Id-asistantregistrar३५३@gmail.com

जा.क्र.उनि/ससे/सिडको/क्र.१५४-ब (२९)/ जाहीर नोटीस / ३३७९/२०२६ — दिनांक :- १२/१०/२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब २९ (१) अंतर्गत दाखल दाव्यावरील सुनावणीची जाहीर नोटीस.**

**चेअरमन/सेक्रेटरी,**
**जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.**
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. .... अर्जदार

**विरुध्द**

**श्रीम. लिना जगदिश अहूजा**
शॉप नं.५२, जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
भुखंड क्र.३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९.. ....जाब देणार

**तुम्हास नोटीस देणेत येते की,**

**१)** अर्जदार संस्थेनी जाबदेणार श्रीम. लिना जगदिश अहूजा (शॉप नं.५२), यांचे विरुध्द थकीत देखभाल शुल्क व इतर शुल्क अशी एकुण **रक्कम रु. १,९५, ४६३/-** भरण्यात आली नसल्यामुळे कलम १५४ ब २९ अन्वये वसूली दावा दि.०५/०५/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. या कार्यालयामार्फत सदर दि. २६/०६/२०२५ १५/०७/२०२५, १२/०८/२०२५, १०/१०/२०२५, व २९/०९/२०२६, सुनावणीस जाबदेणार श्रीम.लिना जगदिश अहूजा हया सतत गैरहजर राहीले असल्याने सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता निश्चित करण्यात येत आहे.

**२)** अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.

**३)** जाब देणार यांनी त्यांच्या बचवासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.

**४)** आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

सही/-
(शंकर पाटील)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई

---

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांचे कार्यालय**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, ५ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
E-mail Id-asistantregistrar३५३@gmail.com

जा.क्र.उनि/ससे/सिडको/क्र.१५४-ब (२९)/ जाहीर नोटीस / ३३७२/२०२६ — दिनांक :- १२/१०/२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब २९ (१) अंतर्गत दाखल दाव्यावरील सुनावणीची जाहीर नोटीस.**

**चेअरमन/सेक्रेटरी,**
**जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.**
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. .... अर्जदार

विरुध्द

**श्रीम. रक्षा के. गाला**
शॉप नं.०३, जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. ....जाब देणार

**तुम्हास नोटीस देणेत येते की,**

**१)** अर्जदार संस्थेनी जाबदेणार श्रीम. रक्षा के. गाला (शॉप नं.०३), यांचे विरुध्द थकीत देखभाल शुल्क व इतर शुल्क अशी एकुण रक्कम **रु. १,९५,४६३/-** भरण्यात आली नसल्यामुळे कलम १५४ ब २९ अन्वये वसूली दावा दि.०२/०७/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. या कार्यालयामार्फत सदर दिनांक १२/०८/२०२५, १०/१०/२०२५, व २९/०९/२०२६, सुनावणीस जाबदेणार श्रीम. रक्षा के. गाला हया सतत गैरहजर राहीले असल्यानेसदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता निश्चित करण्यात येत आहे.

**२)** अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.

**३)** जाब देणार यांनी त्यांच्या बचवासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.

**४)** आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

सही/-
(शंकर पाटील)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई

---

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांचे कार्यालय**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, ५ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
E-mail Id-asistantregistrar३५३@gmail.com

जा.क्र.उनि/ससे/सिडको/क्र.१५४-ब (२९)/ जाहीर नोटीस / ३३७५/२०२६ — दिनांक :- १२/१०/२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब २९ (१) अंतर्गत दाखल दाव्यावरील सुनावणीची जाहीर नोटीस.**

**चेअरमन/सेक्रेटरी,**
**जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.**
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. .... अर्जदार

विरुध्द

**श्रीम. संध्या हिंदुराव घोरपडे**
शॉप नं. २२, जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
भुखंड क्र.३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९.. ....जाब देणार

**तुम्हास नोटीस देणेत येते की,**

**१)** अर्जदार संस्थेनी जाबदेणार श्रीम. संध्या हिंदुराव घोरपडे, (शॉप नं. २२,), यांचे विरुध्द थकीत देखभाल शुल्क व इतर शुल्क अशी एकुण **रक्कम रु.१,१३,७०५/-** भरण्यात आली नसल्यामुळे कलम १५४ ब २९ अन्वये वसूली दावा दि.०५/०५/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. या कार्यालयामार्फत सदर दि. २६/०६/२०२५, १५/०७/२०२५, १२/०८/२०२५, १०/१०/२०२५व २९/०९/२०२६, सुनावणीस जाबदेणार श्रीम. संध्या घोरपडे हया सतत गैरहजर राहीले असल्याने सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता निश्चित करण्यात येत आहे.

**२)** अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.

**३)** जाब देणार यांनी त्यांच्या बचवासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.

**४)** आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

सही/-
(शंकर पाटील)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई

---

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांचे कार्यालय**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, ५ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
E-mail Id-asistantregistrar३५३@gmail.com

जा.क्र.उनि/ससे/सिडको/क्र.१५४-ब (२९)/ जाहीर नोटीस / ३३८०/२०२६ — दिनांक :- १२/१०/२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब २९ (१) अंतर्गत दाखल दाव्यावरील सुनावणीची जाहीर नोटीस.**

**चेअरमन/सेक्रेटरी,**
**जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.**
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. .... अर्जदार

विरुध्द

**श्री. कृष्णा कुमारीम रामचंद्रन**
जी-४०४, जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
भुखंड क्र.३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९.. ....जाब देणार

**तुम्हास नोटीस देणेत येते की,**

**१)** अर्जदार संस्थेनी जाबदेणार श्री. कृष्णा कुमारीम रामचंद्रन, (जी-४०४), यांचे विरुध्द थकीत देखभाल शुल्क व इतर शुल्क अशी एकुण **रक्कम रु.१,९५, ४६३/-** भरण्यात आली नसल्यामुळे कलम १५४ ब २९ अन्वये वसूली दावा दि. २/०७/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. या कार्यालयामार्फत सदर दि. १२/०८/२०२५, १०/१०/२०२५, व २९/०९/२०२६, सुनावणीस जाबदेणार श्री. कृष्णा रामचंद्रन हे सतत गैरहजर राहीले असल्याने सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता निश्चित करण्यात येत आहे.

**२)** अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.

**३)** जाब देणार यांनी त्यांच्या बचवासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.

**४)** आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

सही/-
(शंकर पाटील)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई

---

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांचे कार्यालय**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, ५ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
E-mail Id-asistantregistrar३५३@gmail.com

जा.क्र.उनि/ससे/सिडको/क्र.१५४-ब (२९)/ जाहीर नोटीस / ३३७८/२०२६ — दिनांक :- १२/१०/२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब २९ (१) अंतर्गत दाखल दाव्यावरील सुनावणीची जाहीर नोटीस.**

**चेअरमन/सेक्रेटरी,**
**जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.**
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. .... अर्जदार

विरुध्द

**(श्री. अमित प्रदिप पाटील**
शॉप नं. ४६, जय गणेशजी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
भुखंड क्र.३४, सेक्टर ३६, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९ ....जाब देणार

**तुम्हास नोटीस देणेत येते की,**

**१)** अर्जदार संस्थेनी जाबदेणार श्री. अमित प्रदिप पाटील (शॉप नं. ४६,), यांचे विरुध्द थकीत देखभाल शुल्क व इतर शुल्क अशी एकुण **रक्कम रु.१,२६, १८०/-** भरण्यात आली नसल्यामुळे कलम १५४ ब २९ अन्वये वसूली दावा दि.०५/०५/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. या कार्यालयामार्फत सदर दि. ३१/०७/२०२५,०९/०८/२०२५, १०/१०/२०२५ व २९/०९/२०२६, सुनावणीस जाबदेणार श्री. अमित प्रदिप पाटील हे सतत गैरहजर राहीले असल्याने सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता निश्चित करण्यात येत आहे.

**२)** अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.

**३)** जाब देणार यांनी त्यांच्या बचवासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.

**४)** आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

सही/-
(शंकर पाटील)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई

# सानपाड्याच्या विकासाला गती

## मंत्री गणेश नाईक यांच्याकडून कार्यवाहीचे आदेश

**नवी मुंबई : बातमीदार**



सानपाडा विभागातील जनहिताचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते निलेश कचरे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात विविध मागण्यांची निवेदने सादर केली असून या प्रश्नांवर मंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित यंत्रणांना तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

सानपाडा सेक्टर २, भूखंड क्रमांक १३ येथील आयुष्मान आरोग्यवर्धिनी केंद्रातील तांत्रिक त्रुटी दूर करून ते नागरिकांच्या सेवेत सुरू करावे, नवी मुंबईतील १०८ रुग्णवाहिका सेवेचे सक्षमीकरण करून जीपीएस व आधुनिक व्यवस्थापन प्रणाली विकसित करावी, तसेच दिव्यांग नागरिकांचे नव्याने सर्वेक्षण करून पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा, अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या.

याशिवाय सानपाडा सेक्टर २ व ३ येथील ओरिएंटल महाविद्यालयाजवळील प्रशासकीय पार्किंग भूखंडावरील भंगार व बेवारस वाहनांवर कारवाई करावी, परिसराची स्वच्छता राखावी, ग्रीन बेल्टमधील वृक्षसंपदेचे संरक्षण करावे, सुरक्षा व्यवस्था मजबूत करावी आणि नागरिकांच्या सोयीसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह उभारावे, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी सानपाडा सेवा समितीचे पदाधिकारी तुषार बोंबे आणि अनिल शिळकर यांनीही स्थानिक समस्या मांडल्या. सानपाड्याचा विकास म्हणजे नागरिकांना सुरक्षित, आरोग्यदायी आणि सुविधायुक्त जीवनमान मिळवून देणे, ही भूमिका घेऊन निलेश कचरे सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

# नवरात्रोत्सवानिमित्त काव्यसंमेलन उत्साहात

**उरण : वार्ताहर**

वहाळ येथील दापोलकर परिवारातर्फे नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून दिमाखदार आणि भव्य काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनात नामवंत कवी आणि कवयित्रींनी आपल्या बहारदार रचनांनी उपस्थित रसिकांची मने जिंकून घेतल्याने नवरात्रोत्सवाचा आनंद द्विगुणित झाला. या विशेष काव्य संमेलनाचे आयोजन काव्य दरबार उरण, आगरी विकास मंच नवी मुंबई आणि को. म. सा. प. रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.



प्रसिद्ध कवी प्रकाश ठाकूर, कवयित्री मिनल माळी, कवी हरिश्चंद्र माळी, कवी पुंडलिक म्हात्रे आणि कवयित्री रेश्मा ठाकूर यांनी या वेळी हजेरी लावली होती.कार्यक्रमाची सुरुवात अतिशय भक्तिमय आणि उत्साही वातावरणात झाली. उपस्थित सर्वच कवींनी आपल्या स्वलिखित कविता सादर करून विविध सामाजिक, भावनिक आणि कौटुंबिक पैलूंवर प्रकाश टाकला. कवितांसोबतच नवरात्रोत्सवाचे औचित्य साधत सादर करण्यात आलेल्या पारंपरिक गीतांमुळे संपूर्ण वातावरणात एक वेगळाच रंग भरला गेला. कवींच्या एकापेक्षा एक सरस सादरीकरणामुळे कार्यक्रमाची रंजकता उत्तरोत्तर वाढत गेली.

तालवादक विघ्नहार आणि रोनित यांची उत्तम साथ लाभली. तसेच निवेदक अलंकार पाटील यांच्या उत्तम साथीमुळे प्रत्येक कविता आणि गीताला वेगळीच उंची मिळाली. या काव्य संमेलनाचे निवेदन साहित्यिका मिनल माळी यांनी केले. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात सर्व कवी आणि कलाकारांना भरभरून दाद दिली.

## दुर्गामाता दौड : (माळ आठवी)







**पनवेल : अखंड हिंदू समाज शिवछत्रपती, धर्मवीर शंभू छत्रपती यांच्या ध्येयधोरणांवर मार्गक्रमण करीत आहे. नवरात्रोत्सवात आई तुळजाभवानीच्या चरणी लीन होण्यातच जीवनाचे सार्थक आहे. शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानकडून रविवारी पनवेल येथील नानोशी, वाजे, पळस्पे, कुडावे, ओवले गाव, करंजाडे आदी ठिकाणी दुर्गा दौड उत्साहात पार पडली.**

# शिक्षण प्रसारक विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

एन. आर. बी. एज्युकेशनल सोशल ट्रस्ट संचलित शिक्षण प्रसारक विद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी शाळेच्या मैदानावरील हिरवळीवर बसून पुस्तक वाचनाचा आनंद घेत निसर्गाच्या सान्निध्यात पुस्तकांशी मैत्रीचा आगळावेगळा अनुभव घेतला.



कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नामदेव भगत यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे जीवनातील महत्त्व विशद करत मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "पुस्तके ही माणसाची खरी मित्र असतात. ती आपल्याला केवळ ज्ञान देत नाहीत, तर योग्य-अयोग्य यातील फरक ओळखण्याची दृष्टीही देतात. वाचनामुळे विचारांना दिशा मिळते, व्यक्तिमत्त्व समृद्ध होते आणि जीवनातील संकटांवर मात करण्याचे बळ मिळते. विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या पुस्तकांबरोबरच थोर व्यक्तींची चरित्रे, प्रेरणादायी साहित्य आणि विज्ञानविषयक पुस्तके आवर्जून वाचावीत. आज वाचनाची लावलेली सवय उद्याच्या उज्ज्वल भविष्याचा पाया ठरेल."

## हिरवळीवर वाचनाचा आगळा अनुभव

विद्यालयाच्या माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शेखर जगताप यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्याचे आवाहन केले. आपल्या भाषणात ते म्हणाले, "वाचाल तर वाचाल हा केवळ घोषवाक्य नसून यशस्वी जीवनाचा मूलमंत्र आहे. मोबाईलच्या आणि डिजिटल माध्यमांच्या जगात वावरताना पुस्तक वाचनाची सवय हरवू देऊ नका. पुस्तकांमधून मिळणारे ज्ञान माणसाला समृद्ध करते, त्याची कल्पनाशक्ती वाढवते आणि स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता विकसित करते. दररोज किमान पंधरा ते वीस मिनिटे वाचनासाठी द्या. कारण आज तुम्ही वाचलेले एक पान उद्या तुमच्या आयुष्याला नवी दिशा देऊ शकते."

## नवरंग | रंग जांभळा



रामकृष्ण हरी स्वयंसहाय्यता ग्रुप, जसखार, उरण



साईराज गोल्डन व्ह्यू को.हौ.सोसायटी महिला मंडळ, पेठगाव (कोळखे), पनवेल



मैत्री ग्रुप, उरण



शुभमंगल वाद्यवृंद, भेंडखळ, उरण



वक्रतुंड उत्पादक महिला संघ, सोनारी, उरण



एस.बी.आय. कॉलनी, नेरूळ

















**पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विविध ठिकाणच्या मंडळांना भेटी देऊन देवीचे दर्शन घेतले आणि भाविकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी उपनगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, भाजप विभागीय अध्यक्ष निलेश खारकर, सुहास गोंधळी, नंदूकुमार ठाकूर, अंकुश ठाकूर, मनोज नाईक, पिले, शैलेश भगत, समीर मढवी, रविकांत म्हात्रे, संतोष पाटील, प्रियंका शिंदे, अभिमन्यू दापोलकर, प्रणय कोळी, प्रणय कडू आदी उपस्थित होते.**

# रेवदंड्यात ४०० लिटर दारू जप्त

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अवैध गावठी हातभट्टीच्या दारूची वाहतूक करणाऱ्यांविरोधात रेवदंडा पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल ४०० लिटर गावठी दारू जप्त केली आहे. या कारवाईत दारूच्या साठ्यासह वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार असा एकूण तीन लाख ४२ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. ही कारवाई १७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १.२० वाजण्याच्या सुमारास वावे नाका ते वळवली गावादरम्यान अलिबाग-रोहा मार्गावर करण्यात आली.



- तीन लाख ४२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत
- वावे नाका ते वळवलीदरम्यान कारवाई

रेवदंडा पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार गावठी हातभट्टीची दारू विक्रीसाठी पुरवठा करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी संबंधित वाहनावर कारवाई केली. यावेळी दारूने भरलेल्या रबरी ट्यूब आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार जप्त करण्यात आली.

जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये अंदाजे तीन लाख रुपये किमतीची कार आणि गावठी हातभट्टीची दारू यांचा समावेश असून एकूण मुद्देमालाची किंमत तीन लाख ४२ हजार २०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेवदंडा पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुजीत गडदे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सुधीर पाटील या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. अवैध दारूची वाहतूक आणि विक्रीसाठी होणारा पुरवठा रोखण्यासाठी रेवदंडा पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# पळसदरी येथील स्वामी समर्थ मठाच्या रस्त्याचे भूमिपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.



यावेळी मठाधिपती विक्रांत दरेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ॲड. राजेंद्र निगुडकर यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर पंचायत समितीच्या सभापती नमिता घारे यांच्या हस्ते रस्त्याच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे समाज कल्याण समिती सभापती नारायण डामसे, सदस्य उषा ठोंबरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे, ॲड. पूजा सुर्वे, महिला तालुकाध्यक्ष ॲड. रंजना धुळे, माजी पंचायत समिती सदस्य रवींद्र देशमुख, माजी सरपंच जयेंद्र देशमुख, माजी नगरसेवक सोमनाथ ठोंबरे, गौरव शिर्के, पारस कदम, अविनाश म्हामले, अजित पवार, राजेंद्र देशमुख, प्रवीण देशमुख आदी उपस्थित होते.

पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठात दर गुरुवारी, शनिवारी, रविवारी तसेच इतर दिवशीही मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे मठाकडे जाणारा रस्ता महत्त्वाचा मानला जातो. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर भाविकांसह स्थानिक ग्रामस्थांची ये-जा अधिक सुलभ होणार आहे.

यावेळी बोलताना सभापती नमिता घारे यांनी, सुधाकर घारे यांच्या प्रयत्नांतून तसेच जिल्हा परिषद सभापती नारायण डामसे आणि सदस्य उषा ठोंबरे यांच्या माध्यमातून स्वामी समर्थ मठाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली. स्वामी समर्थांच्या सेवेसाठी योगदान देण्याची संधी आम्हाला मिळाली. हे आपचे भाग्य समजते, असे म्हटले. दीपक श्रीखंडे यांनीही आपले विचार मांडले.

# टँकरच्या पाण्यावर पीक वाचवण्याची शेतकऱ्याची धडपड

**खोपोली : प्रतिनिधी**

यंदा पाऊस कमी प्रमाणात पडला. त्यामुळे भातशेती वाचविण्यासाठी शेतकऱ्यांपुढे मोठे आव्हान असताना देवन्हावे गावातील सुदाम नामदेव नलावडे यांनी एक एकरातील भात पीक वाचवण्यासाठी टँकरने पाणी आणून शेतात सोडले आहे.

खालापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात मोठमोठे कारखाने असल्याने शेतीकडे व्यवसाय कोणीही करत नाही. अशात तालुक्यात काही मोजकेच शेतकरी शेती लागवड करीत आहे. यासाठी मजूर, खत यांच्यासाठी मोठी पदरमोड करावी लागत आहे. त्यातच रायगड जिल्ह्यात पावसाने घेतलेल्या माघारीमुळे भात शेती संकटात सापडली आहे.



दाणे भरण्याच्या अवस्थेत पाण्या अभावी पीक करपण्याचा धोका निर्माण झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. शेताला टँकरने पाणी देणे हा पिके वाचवण्यासाठीचा एक अत्यंत खर्चिक पण आपत्कालीन पर्याय आहे. परंतु हातातोंडाशी आलेले पीक धोक्यात आल्याने नलावडे या शेतकऱ्याने टँकरच्या पाण्याचा आधार घेतला आहे.

# आमदार अनिकेत तटकरे यांनी घेतले जोगेश्वरीचे दर्शन

**नागोठणे : बातमीदार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते आमदार अनिकेत तटकरे यांनी नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून नागोठण्याचे ग्रामदैवत जोगेश्वरी मातेचे दर्शन घेऊन पूजा-अर्चा केली. देवस्थान विश्वस्त व उत्सव समितीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी देवस्थान विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, सचिव भाईसाहेब टके, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन, उत्सव समिती अध्यक्ष चंद्रकांत ताडकर, सहसचिव अनिल पवार, खजिनदार सतीश पाटील, सदस्य मच्छिंद्र साळुंखे, युवा नेते मनोज टके, मयूर खैरे, ज्येष्ठ ग्रामस्थ तात्या खंडागळे, भाऊ मोरे, हभप विजय शहासने यांच्यासह भक्तगण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.







**नागोठणे :** येथील गवळआळीतील मंदिरात आयोजित सार्वजनिक नवरात्रोत्सवाला भाजपचे नेते प्रकाश देसाई यांनी भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर जोगेश्वरी मातेचे दर्शन घेऊन मनोभावे पूजा-अर्चा केली. देवस्थान उत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष चंद्रकांत ताडकर व उपाध्यक्ष संतोष चितळकर यांनी देसाई यांचा सन्मान केला. यावेळी माजी सरपंच विलास चौलकर यांच्यासह उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# वाचन प्रेरणा दिन साजरा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती आणि वाचन प्रेरणा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

भारतीय एज्युकेशन सोशल चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी डॉ. कलाम यांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली, तर विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर प्रकाश टाकत वाचन केले.




# अनिता म्हात्रेंचा 'आगरी लस्सी' ब्रँड!

**पाली : प्रतिनिधी**

स्त्रियांमधील नेतृत्वगुण आणि काहीतरी नवीन करून दाखवण्याची जिद्द आज समाजात अनेक क्षेत्रात दिसून येत आहे. रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यातील आमटेम गावच्या अनिता म्हात्रे या अशाच एका कर्तबगार स्त्रीचे उत्तम उदाहरण आहेत. स्वतःच्या कौशल्याने आणि कठोर परिश्रमाने त्यांनी 'आगरी लस्सी' हा आगळावेगळा आणि लोकप्रिय ब्रँड विकसित केला आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांचे लक्ष वेधून घेणारे 'आगरी लस्सी'चे छोटेसे दुकान आज अनेक खवय्यांचे आवडते केंद्र बनले आहे. सहा वर्षांपूर्वी म्हात्रे डेअरीची सुरुवात करताना काहीतरी वेगळे आणि स्थानिक ओळख असणारे उत्पादन बनवण्याचा विचार अनिता यांनी केला. त्यांचा मुलगा मितेश याने या कल्पनेला




'आगरी लस्सी' हे नाव दिले.

साधारण सहा वर्षांपूर्वी म्हात्रे कुटुंबाची परिस्थिती अत्यंत बिकट होती. पती मजुरीचे काम करत होते. दोन मुलींची लग्ने झाली असली तरी दोन मुलांचे शिक्षण बाकी होते. मुलांच्या शाळेची आणि कॉलेजची फी कशी भरायची हा प्रश्न दरमहा उभा राहायचा. स्वतः पूर्णपणे निरक्षर असलेल्या, ज्यांना साधी सहीही करता येत नव्हती आणि अंगठा लावावा लागायचा, अशा अनितातार्ईंनी मात्र मुलांच्या शिक्षणासाठी हार मानली नाही. त्यांनी हाताला मिळेल ते काम केले. रोजंदारीवर कंपनीत काम करण्यापासून ते डोक्यावर टोपली घेऊन दारोदार

## *आजच्या युगातील नवदुर्गा*

***शिक्षण म्हणजे केवळ कागदावरील पदवी नव्हे, तर संकटांना सामोरे जाण्याचे चातुर्य हे अनिता म्हात्रे यांनी दाखवून दिले आहे. स्वतः अशिक्षित असूनही त्यांनी अतिशय सचोटीने आणि कौशल्याने आपल्या उद्योगाची घडी बसवली. संकटाच्या वेळी भाजी विकण्यापासून सुरू झालेला हा प्रवास आज सन्मानाने जगण्याचा मार्ग बनला आहे. खऱ्या अर्थाने त्या आजच्या युगातील 'दुर्गा' आहेत.***

भाजी विकण्यापर्यंत सर्व प्रकारचे काबाडकष्ट त्यांनी हसतमुखाने पेलले.

अशिक्षित असूनही अनितातार्ईंनीचे व्यावहारिक ज्ञान अफाट होते. त्यांनी स्वतःच्या हिमतीवर आवश्यक ती सर्व कौशल्ये आत्मसात केली आणि गुणवत्ता व अस्सलतेशी कधीही तडजोड केली नाही.

या आगरी लस्सीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची अस्सलता आणि शुद्धता. अनिता स्वतः गावातील म्हशीच्या दुधापासून घट्ट दही आणि मलाई तयार करतात. यामध्ये कोणतेही कृत्रिम पदार्थ न वापरता फक्त साखरेचा व वेलचीचा वापर केला जातो आणि मातीच्या कुल्हडमध्ये ही लस्सी ग्राहकांना अगदी नम्रतेने व हसतमुखाने दिली जाते. दही संपल्यास त्या बाहेरून दही न आणता दुकान बंद करतात, ज्यामुळे ग्राहकांचा त्यांच्या गुणवत्तेवर गाढ विश्वास निर्माण झाला आहे.

उकाड्याचा हंगाम, गणेशोत्सव आणि ऑक्टोबर हिटमध्ये दिवसाला तब्बल १५ ते २५ किलो लस्सीची विक्री होते, ज्यातून त्यांना दिवसाला चांगले उत्पन्न मिळते. या व्यवसायातून त्या आपला घरगाडा उत्तमरीत्या चालवत आहेत. लस्सीसोबतच त्यांनी बनवलेले आगरी मसाला ताक, सात्विक तूप आणि आगरी खरवस या उत्पादनांनाही प्रचंड मागणी आहे.

आमदार, नेते, पुढारी, मनोरंजन क्षेत्रातील कलाकार आणि प्रसारमाध्यमांतील लोक आवर्जून या दुकानाला भेट देऊन लस्सीचा आस्वाद घेतात. केवळ एका कल्पनेच्या जोरावर आणि कौटुंबिक सहकार्याने अनिता म्हात्रे यांनी स्थानिक लस्सीला ब्रँडचे स्वरूप मिळवून दिले आहे. जिद्द, स्वच्छता आणि आदरातिथ्य यांच्या बळावर महिला व्यवसायात कशी उत्तुंग भरारी घेऊ शकतात, याचे अनिता म्हात्रे हे अत्यंत प्रेरणादायी उदाहरण आहेत.

# संजय पाटील यांची सोसायटी चेअरमनपदी निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

नागाव येथील गणेश कृषक सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष संजय हरिश्चंद्र पाटील यांचा संस्थेच्या मासिक सभेत सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष योगेश मगर यांच्या हस्ते हा गौरव जाला.

संजय पाटील यांनी बेलकडे ग्रामपंचायतीचे अनेक वर्षे सरपंचपद भूषविले असून अलिबाग तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती म्हणूनही काम केले आहे. राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव, जनसंपर्क आणि कार्यतत्परता यांची दखल घेत त्यांची गणेश कृषक सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झाली आहे.

यावेळी योगेश मगर यांनी संजय पाटील यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सहयोग पतसंस्थेचे संचालक मंडळ आणि कर्मचारीवर्ग यांच्या वतीनेही त्यांचे अभिनंदन करण्यात आले.



# भारत-विंडीज मालिका बरोबरीत

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात बंगळुरू येथे झालेला पाचवा आणि शेवटचा टी-२० सामना पावसामुळे रद्द करावा लागल्याने भारतीय संघाला मालिकेत २-२ अशा बरोबरीवर समाधान मानावे लागले. यासह २०२२नंतर पहिल्यांदाच भारतीय संघावर मायदेशातील टी-२० मालिका जिंकण्यात अपयश आले.



दिवसभरातील खराब हवामानामुळे भारत-वेस्ट इंडिज यांच्यातील पाचवा आणि निर्णायक टी-२० सामना प्रत्येकी नऊ षटकांचा करण्यात आला होता. भारताने ७.४ षटकांत पाच गडी गमावून ११८ धावा केल्या, मात्र त्यानंतर पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने सामना पुढे होऊ शकला नाही.

नाणेफेकीच्या वेळी श्रेयस अय्यरने भुवनेश्वर कुमारच्या भारतीय संघातील पुनरागमनाची घोषणा केली, तेव्हा चाहत्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. मात्र, पावसामुळे भुवनेश्वरला गोलंदाजी करण्याची संधीच मिळाली नाही. तरीही न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी पाच सामन्यांच्या मालिकेसाठी तो भारतीय संघाचा भाग असणार आहे.

## नमन धीरची तुफानी फटकेबाजी

विंडीजविरुद्धचा सामना रद्द झाला असला आणि मालिका बरोबरीत सुटली असली तरी भारताचा मधल्या फळीतील फलंदाज नमन धीर याने खेळ थांबवण्यापूर्वी तुफानी फटकेबाजी करून एक खास विक्रम आपल्या नावे केला.



टी-२० क्रिकेटमध्ये एका डावात किमान पाच चेंडू खेळून सर्वाधिक स्ट्राईक रेटने धावा काढण्याचा विक्रम नमन धीरने आपल्या नावे केला आहे. नमनने सहा चेंडूंचा सामना करताना तीन षटकारांसह नाबाद २४ धावा काढल्या. यादरम्यान, त्याचा स्ट्राईक रेट ४०० एवढा राहिला. याबरोबरच नमनने युवराज सिंग आणि दिनेश कार्तिकचा विक्रम मोडला. युवराजने २००७च्या टी-२० वर्ल्डकपमध्ये इंग्लंडविरुद्ध झालेल्या लढतीत सहा चेंडूत सहा षटकार ठोकत एक मोठा विक्रम नोंदवला होता. या खेळीच्या अखेरीस युवराज सिंगने १६ चेंडूत ५८ धावा कुटल्या होत्या. त्यावेळी त्याचा स्ट्राईक रेट ३६२.५ एवढा राहिला होता, तर २०१८ साली कार्तिकने आठ चेंडूत ३६२.५च्या स्ट्राईक रेटने नाबाद २९ धावा काढल्या होत्या. आता नमनने या दोघांचाही विक्रम मोडित काढला.

# जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत 'सीकेटी'चे विद्यार्थी चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या सहकार्याने पनवेल महानगरपालिका आयोजित जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा नुकतीच पनवेलमधील दि.बा. पाटील हायस्कूलमध्ये झाली. या स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश मिळविले.



सहदेव महादेव पयेर आणि अक्षरा अमोल सावंत यांनी प्रथम, जय दीपक कांबळे आणि भक्ती कृष्णा पंदेरकर यांनी द्वितीय, तर ऋतुजा रमेश माने हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. या सर्व विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय शालेय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पाकिस्तानी क्रिकेटपटू दबावाखाली –फखर जमान

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तान संघ सध्या रसातळाला पोहचला आहे. गेल्या नऊ वर्षांत संघाला एकही आयसीसी ट्रॉफी जिंकण्यात यश मिळालेले नाही. याशिवाय इतर स्पर्धांमधील व द्विपक्षीय मालिकेतील संघाच्या कामगिरीवर सातत्याने प्रश्नचिन्ह उभारले जात आहे. याचदरम्यान आता पाकिस्तानचा फलंदाज फखर जमान याने संघावर आयसीसीचे विजेतपद जिंकण्याचा दबाव असल्याची कबुली दिली आहे.

आयसीसीची मोठी ट्रॉफी जिंकण्याची पाकिस्तानची प्रतीक्षा आता दहाव्या वर्षात पोहचण्याच्या मार्गावर आहे. या पार्श्वभूमीवर फखर जमानने पीटीआयशी बोलताना सांगितले, आयसीसीची ट्रॉफी जिंकण्याची जबाबदारी आमच्यावर संघ म्हणून आहे. पाकिस्तानला बऱ्याच काळापासून आयसीसीचे विजेतपद जिंकता आलेले नाही, त्यामुळे लोक निराश होणं स्वाभाविक आहे. आम्ही चांगली कामगिरी करतो, तेव्हा चाहते आमच्यावर प्रेमाचा आणि कौतुकाचा वर्षाव करतात याचीही आम्हाला जाणीव आहे. आम्ही ही गोष्ट खूप गांभीर्याने घेत आहोत.

## आयपीएलचा मिनी ऑक्शन १६ डिसेंबरला गोव्यात?

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीगच्या २०२७मध्ये होणाऱ्या २०व्या हंगामासाठी सर्व फ्रँचायझींनी आतापासूनच तयारी सुरू केली आहे. त्यातच भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने खेळाडूंच्या लिलावासाठी ठिकाण निश्चित केल्यानंतर आता संभाव्य तारीखही समोर आली आहे. यंदा मिनी ऑक्शन होणार असून हा लिलाव गोव्यात आयोजित करण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला होता. आता हा लिलाव १६ डिसेंबर रोजी होण्याची शक्यता आहे. बीसीसीआयच्या लॉजिस्टिक्स टीमने पाठवलेल्या व्हॉट्सअॅप मेसेजमधून ही माहिती समोर आली आहे.

## पूर्वा कोळेकरला राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक

### राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस दलातील नवनाथ कोळेकर यांची कन्या पूर्वा हिने राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेच्या ५३ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



पूर्वा ही सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील नांदल गावची रहिवासी आहे. तिच्या या यशामुळे कोळेकर कुटुंबासह नांदल गाव आणि नवी मुंबई पोलीस दलात आनंदाचे वातावरण आहे.

राज्यस्तरावर सुवर्णपदक मिळवून राष्ट्रीय स्पर्धेत स्थान मिळवणाऱ्या पूर्वाकडून आता राष्ट्रीय स्तरावरही दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे. तिच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या जात आहेत.








**झंकार नवरात्रोत्सव**










**पनवेल : येथील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने मिडलक्लास हौसिंग सोसायटीमध्ये आयोजित झंकार नवरात्रोत्सवाच्या सातव्या दिवशी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक विजय खानावकर, शशिकांत शेळके, महादेव मधे, सुमित झुंजारराव, नगरसेविका रुचिता लोंढे, माजी नगरसेवक अनिल भगत, अरविंद सावळेकर, सदाशिव कांबळे, रूपेश नागवेकर, प्रशांत शेट्ये आदी उपस्थित होते. यावेळी दांडिया स्पर्धेत उत्कृष्ट गरबा नृत्य सादर करणाऱ्या स्पर्धकांना व बालकलाकारांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.**






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com